

आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ७० ■ अंक क्र.२९ ■ शनिवार ३१ ऑक्टोबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26

डॉ.गौतम शाह धुळ्यात उपलब्ध

गुडघे दुखी, कंबरदुखी, स्लीप डिस्क, संधीवात, सायटीका या रुग्णांवर ओझोन थेरपी व गुडघ्याची इंजेक्शन थेरपीने यशस्वी उपचार **दि.०२ नोव्हेंबर ते ०७ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत धुळे येथे उपलब्ध असणार आहेत. स.१० ते २ दु.**

संपर्क :- **डॉ.गौतम शाह M.S.** (ऑर्थो) शाह क्लिनिक श्री.विठ्ठल हॉस्पीटल, जुने आस्था हॉस्पीटल, रामवाडीसमोर, मालेगावरोड, धुळे (फोन नं.०२५६२-२३५११३) भ्रमणध्वनी-०८६००३५१०००/९८८१२७८६९८

भूतानमध्ये हिमनदीचे सरोवर फुटून जलप्रलय महामार्ग उध्वस्त, पश्चिम बंगाल-आसामला इशारा

भूतान, दि. ३० : नेपाळ मधील नैसर्गिक आपत्तीच्या आठवणी ताज्या असतानाच आता भूतान मध्येही हिमनदीचे सरोवर फुटल्याने मोठा जलप्रलय निर्माण झाला आहे. भूतान मधील शिंताफू त्शो हिमनदीचे सरोवर फुटल्याने प्रचंड पाण्याचा प्रवाह निर्माण झाला. या पुरात प्रसिद्ध गासा त्साचू हा गरम पाण्याचा झरा पूर्णपणे वाहून गेला आहे. पुनाखा-गासा महामार्गाचेही मोठे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी रस्ते उद्ध्वस्त झाल्याने वाहतूक बंद करण्यात आली आहे. या घटनेत आतापर्यंत जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. मात्र, सरोवरातून बाहेर



पडलेले पाणी संकोश नदीत पोहोचल्याने भारतातील पश्चिम बंगाल आणि आसाम या राज्यांना पुराचा धोका निर्माण झाला आहे. दरम्यान, पश्चिम बंगालमध्ये १० हजारांहून अधिक नागरिकांचे स्थलांतर करण्यात आले आहेत.

भूतानमधील सरोवर फुटल्यामुळे निर्माण झालेल्या पुराचा संभाव्य धोका लक्षात घेऊन पश्चिम बंगाल प्रशासन सतर्क झाले आहे. अलीपूरद्वार जिल्ह्यातील १० हजारांहून अधिक नागरिकांना सुरक्षित ठिकाणी आणि मदत शिबिरांमध्ये हलवण्यात आले आहे. नागरिकांना धोक्याची सूचना देण्यासाठी रात्रभर सायरन वाजवण्यात आले. तसेच नागरिकांना लवकरात लवकर सुरक्षित ठिकाणी जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे. एनडीआरएफ, एसडीआरएफ आणि आपत्ती व्यवस्थापन पथकेही तैनात करण्यात आली आहेत.

भूतानचे पाणी भारतात पोहोचणार?

शिंताफू हिमनदीचे सरोवर फुटल्यानंतर बाहेर पडलेले पाणी मोछू नदीच्या पात्रात गेले. पुढे मोछू आणि फोछू या नद्या एकत्र येऊन पुनात्सांगछू नदी तयार होते. ही नदी दक्षिणेकडे वाहत भारतात प्रवेश करते. भारतात या नदीला संकोश नदी म्हणून ओळखले जाते. **(पान ४ वर)**



हेलिकॉप्टर कोसळले सहा जण बेपत्ता

चमोली, दि.३० : उत्तराखंडमधील चमोली जिल्ह्यात बद्रीनाथ धामवरून परतणाऱ्या हेलिकॉप्टरचा जोशीमठजवळील चाई गावात अपघात झाला आहे. शुक्रवारी (दि. ३०) रोजी घडलेल्या या दुर्घटनेत ट्रान्स भारत कंपनीच्या हेलिकॉप्टरमधून वैमानिकासह सहा जण प्रवास करत होते. यामध्ये पाच प्रवासी आणि एका वैमानिकाचा समावेश आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हे हेलिकॉप्टर बद्रीनाथहून डेहराडूनमधील सहस्रधाराकडे जात होते. मात्र, जोशीमठ परिसरातील चाई गावाजवळील लष्करी छावणीच्या परिसरात हेलिकॉप्टर कोसळले आणि **(पान ४ वर)**

मलनिस्सारण योजनेबाबत नगरसेवक संतप्त

नगरसेवकांनी ठेकेदारांच्या छातीवर उभे राहून कामे करून घ्यावीत- महापौर मायादेवी परदेशींची सुचना

धुळे, दि.३०- केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० योजनेंतर्गत धुळे शहर मलनिस्सारण योजना टप्पा योजनेच्या हुडको कडून मंजूर १४९.७७ कोटी कर्जाच्या सुधारीत ८.९० टक्के व्याजदरस व करारातील अटी व शर्तींना मान्यता देण्याचा विषय महासभेसमोर ठेवण्यात आला. या विषयावर सत्ताधाऱ्यांसह विरोधकांनीही संताप व्यक्त करत प्रशासनावर प्रश्नांची सरबत्ती केली. मलनिस्सारण योजनेचे काम करणाऱ्या ठेकेदाराच्या छातीवर उभे राहून कामे नगरसेवकांनी करून घ्यावीत. अशी सुचना देत खुर्चीवर आहे तोपर्यंत पारदर्शक काम करेल असे आश्वासन



महापौर मायादेवी परदेशी यांनी महासभेत दिले.

भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात घेण्यात आलेली महासभा महापौर मायादेवी परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी अति. आयुक्त करूणा डहाळे, उपमहापौर ज्योत्सना पाटील, नगरसचिव मनोज वाघ यांच्यासह सर्व सदस्य उपस्थित होते. महासभेच्या सुरूवातीला रावेर गावातील जागा एमआयडीसी करीता जाहीर झाल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार रावल, आ.अनुप अग्रवाल यांच्या अभिनंदनाचा ठराव करण्यात **(पान ४ वर)**

लोकतंत्र बचाओ, अराजकता हटाओ पदयात्रा

देशात अराजकता माजविणाऱ्या विघातक ताकदींना उलथवून टाका- पालकमंत्री ना.रावलांचे आवाहन

धुळे, दि.३०- निवडणूक आयोगातर्फे देशभरात सुरू असलेल्या सखोल विशेष सखोल मतदार पुनरीक्षण मोहिमेच्या आडून काँग्रेसह सर्वच विरोधी पक्ष आणि देशविघातक परकीय शक्ती भारतात संविधानिक संस्थांवर हल्ला करत आहेत. यातून केंद्र सरकार उलथवून टाकण्यासह देशात अराजकता माजविण्याचा प्रयतक होत आहे. मात्र, भारताची जनता सूज्ञ असून, जनतेसह आम्ही काँग्रेससह विरोधकांचा हा प्रयत्न कधीही



यशस्वी होऊ देणार नाही. विरोधकांसह या देशविघातक ताकदींना उलथवून टाकू, असा इशारा राज्याचे पणनमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी आज दिला.

एसआयआरच्या आडून देशभरात **(पान २ वर)**

अखेरच्या श्वासापर्यंत जनतेची सेवा करणार - नरेंद्र मोदी

बसानकांठा, दि. ३० : काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावर आता मोदी यांनी प्रत्युत्तर दिले आहे. मी माझ्या आयुष्याच्या अखेरच्या श्वासापर्यंत भारतातील जनतेची सेवा करत राहणार आहे, असे म्हणत नरेंद्र मोदी यांनी खरगे यांच्या टीकेला उत्तर दिले. यावेळी त्यांनी विरोधकांवर अफवा पसरवून सरकारला बदनाम करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही केला.

गुजरातमधील बसानकांठा जिल्ह्यातील भिलडी येथे आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान मोदी बोलत होते. पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या २४ व्या हप्त्याचे वितरण **(पान ४ वर)**



आंबाफाटा गावाजवळ सहाशे दहा किलो गांजा जप्त; अज्ञात व्यक्ती विरूध्द गुन्हा

शिरपूर, दि.३०- तालुक्यातील आंबाफाटा गावाजवळील डोंगराळ भागात वनविभागाच्या जमिनीवर गांजाची बेकायदा लागवड केल्याचा प्रकार शिरपूर शहर पोलिसांनी उघडकीस आणला. पोलिसांनी छापा टाकून सुमारे सहाशे दहा किलो वजनाची गांजाची झाडे जप्त केली असून, त्यांची अंदाजित किंमत एक कोटी ५२ लाख ५० हजार रुपये आहे. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध शिरपूर शहर पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायद्यानुसार (पान ४ वर)

मोहाडीत सराईत आरोपीची दहशत पोलीसांनी शिताफीने केले गजाआड

धुळे, दि.३०- मोहाडी येथील दंडेवाला बाबा नगरमध्ये फरार आरोपी राजवीर भादा याचा शोध घेण्यासाठी आलेल्या पोलिसांसमोर तलवारीने दहशत निर्माण करून हल्ल्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी त्याला शिताफीने ताब्यात घेत अटक केली. याप्रकरणी मोहाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

राजवीर मिलनसिंग भादा (रा. दंडेवालेबाबा नगर, मोहाडी, ता. जि. धुळे) याच्यावर विविध गुन्हे दाखल असल्याने त्याला ताब्यात घेण्यासाठी गुरुवारी सायंकाळी मोहाडी येथे पोलीस पथक गेले पोलीस आल्याचे समजताच राजवीर भादा हातात लोखंडी तलवार घेऊन पोलिसांसमोर आला. पोलिसांना पाहून मोठ्याने आरडाओरड शिवीगाळ करू लागला. पुढे आल्यास मी स्वतःला, आणि तुम्हालाही तलवारीने मारेल अशी दमदाटी केली.

पोलीस पथक जवळ येत असल्याचे पाहून राजवीरने पोलिसांच्या अंगावर धावून जाण्याचा व वार करण्याचा प्रयतक केला. हातातील तलवार जोरजोरात फिरवून स्वतःलाही तलवारीने दुखापत **(पान ४ वर)**

रवी काफू कालोसे जिल्हा दौऱ्यावर

नंदुरबार, दि.३०(प्रतिनिधी)- भारत सरकारच्या राष्ट्रीय सफाई कर्फ्चारी आयोगाचे सदस्य (भारत सरकारच्या सचिव दर्जा) रवी काफू कालोसे हे दि. ३ व ४ नोव्हेंबर २०२६ रोजी नंदुरबार जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.

त्यांच्या दौऱ्याचा कार्यक्र पुढीलप्रमाणे आहे. दि. ३ नोव्हेंबर,२०२६ रोजी सायंकाळी ५-०० वाजता धुळे येथून नंदुरबारकडे प्रयाण रात्री ८ वाजता नंदुरबार येथे आगमन व मुक्काम. बुधवार, दि. ४ नोव्हेंबर,२०२६ रोजी सकाळी ११-०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार येथे सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध समस्या व **(पान ४ वर)**

शहादा न्यायालयाचा निकाल

पत्नीला मारहाण करण्यापासून रोखण्यासाठी गेलेल्या महिलेला ठार करणाऱ्यास जन्मठेप

नंदुरबार दि.३० (प्रतिनिधी) : पतीकडून पतकीला होत असलेली मारहाण थांबविण्यासाठी मध्यस्थी करण्यास गेलेल्या कोकीलाबाई भिल यांची लाकडी थापीने मारहाण करून हत्या करणाऱ्या आरोपीस शहादा येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा आणि २० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. श्रीराम कालू ऊर्फ काल्या शेवाळे (वाघे), रा. कुढावद, ता. शहादा असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे.

घटनेची पार्श्वभूमी अशी की, १ डिसेंबर २०२० रोजी आरोपी श्रीराम शेवाळे हा पत्नी सिंधुबाई व दोन लहान मुलांसह शिरुड दिगर येथे नातेवाईक मुरसिंग तिरसिंग भिल यांच्या घरी पाहुणा म्हणून आला होता. रात्री जेवणानंतर मुरसिंग भिल शेतात पाणी भरण्यासाठी गेले असताना श्रीराम व त्याची पतकी सिंधुबाई यांच्यात बाहेरगावी मजुरीसाठी जाण्यावरून वाद झाला. त्यावेळी मुरसिंग यांनी दोघांची समजूत काढून वाद मिटविला होता.

दुसऱ्या दिवशी २ डिसेंबर २०२० रोजी पहाटे श्रीराम हा पत्नी सिंधुबाईला मारहाण व शिवीगाळ करीत असल्याची माहिती मुरसिंग भिल यांना मिळाली. सिंधुबाईला मारहाण करू नये, असे समजावून सांगण्यासाठी कोकीलाबाई गेल्या असता आरोपीला त्याचा राग आला. त्याने घरातील लाकडी थापीने कोकीलाबाई यांच्या डोक्यावर व शरीरावर जोरदार मारहाण केली. पहाटेच्या सुमारास मुरसिंग भिल घरी पोहोचले असता आरोपी **(पान ४ वर)**

भाजपा मध्यवर्ती कार्यालयात संघटनात्मक बैठक संपन्न

धुळे, दि.३०- भारतीय जनता पार्टीच्या उत्तर महाराष्ट्रातील संघटनात्मक बळकटीकरणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण बैठक आज धुळे महानगर येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीत धुळे महानगर, धुळे ग्रामीण, मालेगाव, नंदुरबार, जळगाव शहर, जळगाव पूर्व (रावेर) आणि जळगाव पश्चिम या संघटनात्मक क्षेत्रांतील अध्यक्षांच्या नेतृत्वात अपेक्षित जिल्हा पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्त्यांचा उपस्थितीत बैठक पार पडली.

भारतीय जनता पार्टी, उत्तर महाराष्ट्र विभाग आयोजित, भाजपा प्रदेश संघटन मंत्री अजय जामवाल, व प्रदेश सहसंघटन मंत्री सतीश धोंड **(पान ४ वर)**

दुष्काळ निवारण कामात हलगर्जीपणा खपवून घेणार नाही- आ.नाईकांच्या अधिकाऱ्यांना सुचना

नवापूर, दि.३० (प्रतिनिधी)- नवापूर तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती, पाणीटंचाई, जनावरांसाठी चारा उपलब्धता तसेच शेतकरी कर्जमाफीच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी आमदार शिरीषकुमार नाईक यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर रोजी नवापूर नगरपरिषदेच्या टाऊन हॉलमध्ये तालुकास्तरीय आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी विविध शासकीय विभागांच्या कामकाजाचा आढावा घेत आमदार नाईक



यांनी अधिकाऱ्यांना कामात कोणत्याही प्रकारची दिरंगाई किंवा हलगर्जीपणा करू नये, अशा कडक शब्दांत सूचना दिल्या.

या बैठकीस तालुक्यातील विविध शासकीय विभागांचे अधिकारी, कर्मचारी, सर्व सरपंच तसेच विविध पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी आणि पशुपालकांना भेडसावणाऱ्या संभाव्य समस्यांवर चर्चा करून त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. गावनिहाय परिस्थितीचा आढावा घेऊन शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी आणि गरजू लाभार्थ्यांपर्यंत मदत वेळेत पोहोचवावी, असे आमदारांनी स्पष्ट केले.

अधिकाऱ्यांच्या कामकाजावर नाराजी

दुष्काळी **(पान २ वर)**



आ.अग्रवाल व डॉ.भामरेंच्या उपस्थितीत

प्रहार टोल कामगार संघटना स्थापन फलक अनावरण व नियुक्ती पत्रे दिली

धुळे, दि.३०- धुळे शहरालगत असलेल्या लळींग टोल नाक्यावर भारतीय जनता पार्टी पुरस्कृत प्रहार टोल कामगार संघटनेच्या शाखा फलकाचे अनावरण माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे, धुळे शहराचे आमदार अनुप भैय्या अग्रवाल आणि भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी टोल कर्मचाऱ्यांना विविध पदांवरील नियुक्तीपत्रांचे वितरणही करण्यात आले.

कार्यक्रमात आमदार अनुप अग्रवाल यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना संघटनेने कोणत्याही एका व्यक्तीसाठी काम न करता कामगारांच्या हिताला प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले. कामगारांचे प्रश्न, अडचणी आणि हक्क लक्षात घेऊन संघटनेने कार्य करावे. कामगार संघटनेची एकजूट हीच तिची खरी ताकद असते. त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांनी एकत्रित राहून संघटनेला बळकटी द्यावी, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी माजी केंद्रीय मंत्री डॉ. सुभाष भामरे, आ.अनुप अग्रवाल, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अमळकर, माजी नगरसेवक राजेश पवार, सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल गावडे, रानमळा येथील माजी सरपंच प्रवीण पवार, आकाश परदेशी, भाजपा कामगार आघाडीचे जिल्हाध्यक्ष विजय पवार तसेच दक्षिण मंडळाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली.

संघटनेच्या अध्यक्षपदी योगेश पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. उपाध्यक्षपदी पारस निकम व संदीप गवळी, **(पान ४ वर)**

दिपक ज्वेलर्स

सोने- 22 K -1,29,600 रु.+3% GST

सोने- 24 K -1,40,900 रु.+3% GST

चांदी- 1,87,500 रु.+3% GST

तारगल्ली, सराफ बाजार, धुळे

फोन नं.२३३१०३/२३४१०३

धुळे जिल्हा वडार समाजाची मागणी मंडोरेंच्या बंगल्याचे अतिक्रमण काढा

धुळे, दि.३०-धुळे जिल्हा वडार समाज संघाचे दीपक वेताळ व इतर चौघांनी धुळे महानगरपालिका आयुक्त यांना निवेदन देऊन मंडोरे यांच्या बंगल्याचे अतिक्रमण काढावे अशी मागणी केली आहे. दुसरीकडे आयुक्तांनी देखील याबाबतची माहिती मागवली असून कारवाईचे आश्वासन दिले आहे.

गेल्या काही दिवसापूर्वी वडार समाजाच्या चक्करबडी येथील जमिनीचा वाद निर्माण झाला होता. या घटनेनंतर आता वडार समाज देखील पुढे सरसावला असून दीपक किसन वेताळ,राहुल जगन वेताळ,अशोक मुकुंदा कुसळकर, अनिल शिवराम कुसळकर, अंबादास अशोक लष्कर यांनी धुळे महानगरपालिकेचे आयुक्त यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. २७ ऑक्टोबर रोजी दिलेले या तक्रारीत फायनल प्लॉट नंबर १५७ पैकी, प्लॉट नंबर १७४ अ आणि १७५ब बाबत धुळे महानगरपालिकेने रूपचंद प्रकाश रूपचंद मंडोरे यांना २००६ मध्ये दिलेल्या नोटीसीचा आधार घेत प्रस्तुत मिळकतीत प्लॉट नंबर १७५ ब ही मिळकत अस्तित्वात नसताना तीस फूट पूर्वे कडून पश्चिमेकडे जाणाऱ्या वापर रस्त्यावर अतिक्रमण केले असे या नोटीसित नमूद केले होते. याबाबत मनपातर्फे आजपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही असे निवेदनात नमुद केले आहे.

सदरची मिळकत ही पूर्वी गोविंद खेमजी जैन यांनी १९४१ साली दस्त नोंदवून खरेदी केली. यानंतर ती तिलोकनाथ जगन्नाथ मेयर यांच्याकडून जगन्नाथ लादूराम अग्रवाल यांना १९६१ साली रजिस्टर खरेदी करून घेतली. रूपचंद चंद्राची मंडोरे यांनी अग्रवाल यांच्याकडून १९६२ साली रजिस्टर खरेदी खता द्वारे विकत घेतली. १९९२ च्या दस्त क्रमांक **(पान २ वर)**

चांदे गावांत घरफोडी हजारोंचा ऐवज लंपास

धुळे, दि.३०- चांदे (ता. धुळे) येथील घर आणि किराणा दुकान फोडून चोरट्यांनी ६४ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

चांदे येथे जगदीश दिनकर जाधव (वय ५२) यांचे किराणा दुकान आहे. गुरुवारी पहाटे पूर्वी चोरट्यांनी त्यांचे दुकान फोडले. त्यापाठोपाठ तेथून जवळ असलेले किरण पाटील यांच्या घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी घरातील ऐवज लंपास केला. चोरट्यांनी दोन्ही ठिकाणाहून २२ हजार ५०० रुपयांचे नऊ ग्रॅमचे सोन्याचे टोंगल, २५ हजारांच्या सोन्याच्या बाळ्या, १७ हजारांची रोकड असा एकुण ६४ हजार **(पान २ वर)**

तेरा जणांवर गुन्हा दाखल

अटक करण्यासाठी आलेल्या पोलिस पथकाच्या ताब्यातून आरोपीला पळवले

धुळे, दि.३०- शहरातील नंदी रोड परिसरात एका गुन्ह्यातील फरार आरोपीच्या अटकेसाठी आलेल्या पोलिसांच्या पथकासमोर एकत्र येत काही जणांनी गर्दी केली. गर्दीचा फायदा घेत आरोपी पसार झाला, आरोपीला पसार होण्यास मदत केल्याप्रकरणी १३ जणांविरुद्ध आझाद नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

येथील वडजाई रोड परिसरातील पंताची टपरीजवळील नंदी रोडवर गुरुवारी रात्री साडे नऊच्या सुमारास आझाद नगर पोलीस पथक कारवाईसाठी गेले. जब्बार शाह गुलाब शाह फकीर याला अटकेची कारवाई पोलीस करीत होते. जब्बार शाह फकीर याच्यासह इतरांनी गर्दी केली. आरोपीला पोलिसांच्या ताब्यातून सोडविण्यासाठी उसको तकलीफ हो रही है, **(पान २ वर)**

युवा निबंध स्पर्धेत वैदेही चौधरी प्रथम



दोंडाईचा, दि.२९- हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित हस्ती गुरुकुल दाऊळ शिवार दोंडाईचा येथील इ. सातवीची वैदेही धनश्री पंकज चौधरी या विद्यार्थिनीने उल्लेखनीय यश संपादन करत; संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळविला आहे.

सदरची राज्यस्तरीय निबंध स्पर्धा पॉश अँड पोक्सो अवेअरनेस फाऊंडेशनचा वतीने आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत राज्यभरातून असंख्य विद्यार्थी सहभागी झाले होते. यात हस्ती गुरूकुलच्या वैदेही चौधरी हिने मी माझे गाव **(पान ४ वर)**

अक्कलकुवा ता.तील विकास कामांना गती द्या पालकमंत्री हसन मुश्रीफ यांचे बैठकीत निर्देश



नंदुरबार, दि.३० (प्रतिनिधी)- अक्कलकुवा तालुक्यातील दुर्गम भागात प्रतिकूल परिस्थितीत राहणाऱ्या आदिवासी बांधवांना रस्ते, पिण्याचे पाणी, आरोग्य आणि शिक्षण या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही शासन व प्रशासनाची जबाबदारी आहे. नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ प्रत्यक्ष मिळावा, यासाठी अधिकाऱ्यांनी विशेष लक्ष देऊन विकास कामांना गती द्यावी, असे निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री तथा नंदुरबार जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले.

अक्कलकुवा तालुकास्तरीय आढावा बैठक पालकमंत्री श्री मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली तहसील कार्यालय अक्कलकुवा येथे संपन्न झाली. बैठकीस आमदार आमश्या पाडवी ,जिल्हाधिकारी डॉ.मित्ताली सेठी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, पोलीस अधीक्षक अश्विनी सानप, उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी लघीमा तिवारी, तहसीलदार विनायक घुमरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री मुश्रीफ म्हणाले की, दुर्गम भागातील नागरिकांच्या समस्या आणि अडचणी लक्षात घेऊन प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करावे. स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यासमवेत नियमितपणे सोबत दर एक-दोन महिन्यांनी आढावा बैठका घेऊन स्थानिक प्रश्न सोडविण्यावर भर द्यावा. आदिवासी बांधवांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे आणि त्यांचे जीवनमान उंचावणे हे आपले सामूहिक **(पान ४ वर)**



आपला महाराष्ट्र

विषमुक्त खान पान रामभरोसे

आपण रोज तसेच सणांच्या निमित्ताने भोजनाचा आस्वाद घेतांना काय काय खात असतो ते सगळेच रामभरोसे असते.सेंद्रिय या नावाखाली आपण अन्न धान्य, तेल, तूप, मसाले, कांदा, मिरची, भाजीपाला डाळी खरेदी करीत असतो विश्वासावर पण त्यातही केव्हा विश्वासघात होईल ते सांगता यावयाचे नाही.घरची शेती असेल आणि ती आपण रसायन मुक्त करीत असू तरच शुध्द खान पान शक्य आहे.सध्या तुकाराम मुंडे नावाचे शुध्दिकरणाचे वादळ महाराष्ट्रावर घोंघावत असल्याने ब–याच प्रमाणावर भेसळखोरांना आवर घातला गेला आहे.तरीही चोऱ्या करणारे थांबत नाहीत म्हणून आपले जगणे राम भरोसे आहे असे म्हणणे भाग आहे. सणासुदीच्या काळात आपण जे अन्नपदार्थ खात आहोत, ते किती आरोग्यदायी आणि विषमुक्त आहेत, तसेच त्यांच्या सेवनामुळे आपल्याला कोणत्या प्रकारच्या व्याधी जडू शकतात, याची दखल घेणे आवश्यक आहे. हा विषय नियत चांगली नसणारांनी मोठाच कठीण करून ठेवला आहे.आपले अनमोल जीवन त्या लोकांच्या हातात आपण सोपविलेले असून ते देतील तसे अन्न खाणे भाग आहे.त्यामुळे उदभवणा–या व्याधींनाही आपल्याला सामोरे जावे लागते. इतके आपण परस्वाधीन झालेलो आहोत.

मानवी जीवनासाठी हवा आणि पाण्यानंतर जगण्यासाठी अन्न ही मूलभूत गरज आहे. माणूस प्राचीन काळापासूनच अन्नासाठी संघर्ष करत आला आहे. भौतिक विकास कितीही झाला, तरी अन्नाची गरज कायम राहणार आहे.प्राचिन काळात समाजातील बहुतेक संघर्ष हे अन्न आणि अन्न उपलब्ध करून देणाऱ्या प्रदेशांवरूनच होत असत. स्थलांतराची बहुतेक कारणे सुद्धा अन्न आणि उपजीविकेच्या शोधाशी संबंधित होती. ही प्रक्रिया आजही कोणत्या ना कोणत्या स्वरूपात सुरूच आहे.आजही पोट भरण्यासाठी स्थलांतर होतांना आपण बघत आलेलो आहोत.जगण्यासाठी जे अन्न आपल्याला लागते ते सुरक्षित, पौष्टिक, स्वच्छ, भेसळमुक्त आणि मानवी सेवनासाठी योग्य असलेले हवे. आपल्या संविधानकर्त्यांनी ही मूलभूत गरज लक्षात घेऊन संविधानातील कलम २१ अंतर्गत जगण्याच्या अधिकाराला मूलभूत अधिकाराचा दर्जा दिला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने या अधिकाराचा अर्थ सन्मानाने जगण्याचा अधिकार असा स्पष्ट केला आहे. त्यामध्ये पुरेसे आणि सुरक्षित अन्न मिळण्याचा तसेच जीवनाच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याचा अधिकार समाविष्ट आहे. संविधानातील कलम ४७ हे राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये समाविष्ट असून, अन्नातील पोषक घटकांचे प्रमाण वाढवणे, जीवनमान उंचावणे आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे ही सरकारची जबाबदारी असल्याचे ते स्पष्ट करते.पण ही सगळी तत्वे व्यवस्थेने जिंकल्यावर ठेवून दिलेली असून व्यवस्थेत असलेल्यांची गरज भागली म्हणजे झाले अशी त्यांची मानसिकता आहे.

सन २००६ मध्ये अन्नसुरक्षा अधिनियम लागू करण्यात आला. या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी एक नियामक प्राधिकरण स्थापन करण्यात आले. अन्नपदार्थांचे उत्पादन, साठवणूक, वितरण, विक्री आणि आयात यांचे नियमन करणे तसेच त्यांच्याशी संबंधित व्यवहाराच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवणे ही या प्राधिकरणाची जबाबदारी आहे. ग्राहक संरक्षण कायद्याद्वारे असुरक्षित, भेसळयुक्त, सदोष तसेच चुकीची माहिती देऊन विकल्या जाणाऱ्या अन्नपदार्थांपासून ग्राहकांना संरक्षण देण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी संविधानातील तरतुदींचा अर्थ स्पष्ट करताना अन्नाच्या अधिकारामध्ये अन्नाची उपलब्धता, ते मिळवण्याची सुलभता, आर्थिक आवाक्यात असणे, पोषणमूल्ये आणि त्यासंबंधीची योग्य माहिती या बाबींचा समावेश केला आहे.

जो राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायदा करण्यात आला. या कायद्याद्वारे गरजू लोकांना आर्थिकदृष्ट्या परवडणाऱ्या दरात अन्नधान्य उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.अन्नातील भेसळीविरोधातही पुरेशा कायदेशीर तरतुदी आहेत. मात्र, त्यांच्या अंमलबजावणीत ढिलाई दिसून येते. भेसळयुक्त दुग्धजन्य पदार्थ पकडल्याच्या बातम्या आपण रोजच वाचतो. कारवाई होऊनही अशा प्रकारांची संख्या मोठी असणे ही चिंतेची बाब आहे. म्हणजेच भेसळखोरी ही सुरक्षित अन्न उपलब्ध होण्याच्या मार्गातील मोठी अडचण आहे. सध्यातरी महाराष्ट्रात त्या बाबत आपण सुखी आहोत त्याचे कारण तुकाराम मुंडे करीत असलेली अंमलबजावणी होय.पण, शुद्ध आणि सुरक्षित अन्नाच्या उपलब्धतेबाबत एका अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत आहे. त्यासंबंधी कोणतीही स्पष्ट कायदेशीर तरतूदही नाही. तो प्रश्न म्हणजे कीटकनाशके आणि तणनाशकांच्या अमर्याद वापरामुळे अन्नपदार्थ विषारी बनत चालले आहेत.

इतकेच नव्हे, तर आजारातून बरे होण्यासाठी रुग्णांना दिली जाणारी फळेही विषारी रसायनांपासून मुक्त नाहीत. भाजीपाल्याची परिस्थिती तर आणखी गंभीर आहे. कारण फवारणीनंतर थोड्याच कालावधीत भाज्यांचा वापर केला जातो. त्यामुळे त्यातील विषारी रसायनांचा प्रभाव कमी होण्यासाठी आवश्यक असलेला कालावधीही मिळत नाही.

भारत सरकारने लाल आणि पिवळ्या त्रिकोणाचे चिन्ह असलेल्या कीटकनाशकांच्या फवारणीवर निर्बंध घालण्याची शिफारस केली आहे. कारण ही रसायने अतिविषारी आणि अत्यंत विषारी या श्रेणींमध्ये मोडतात. फवारणीसाठी निळ्या आणि हिरव्या त्रिकोणाचे चिन्ह असलेल्या रसायनांचाच वापर करावा, कारण ती तुलनेने कमी विषारी आणि सुरक्षित श्रेणीत येतात.असे सरकार आणि तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

मात्र, या शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी कोणतीही ठोस कायदेशीर तरतूद नाही. त्यामुळे अशा विषारी रसायनांच्या वापरावर नियंत्रण ठेवता येत नाही.

तणनाशकांसारखी रसायने अत्यंत विषारी असून कर्करोगास कारणीभूत ठरू शकतात. या रसायनांचा प्रभाव जमिनीतही टिकून राहतो आणि तो पिकांपर्यंत पोहोचतो. ज्या भागांमध्ये या रसायनांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे, तेथील एकूण परिस्थितीतून त्याचे दुष्परिणाम दिसून येतात.

पंजाबमधे व एक परिसर हा कर्करोगाचा पट्टा म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. हिमाचल प्रदेशातही कर्करोगाचे प्रमाण राष्ट्रीय सरासरीपेक्षा अधिक आहे. कारण तेथेही फळे आणि भाजीपाल्यावर कीटकनाशके व तणनाशकांचा वापर वाढत चालला आहे. तीच अवस्था महाराष्ट्रात आहे.आपणही सर्व कार्ये रसायनयुक्त खात असतो. गहू, भात, मका यांसारख्या पिकांमध्ये आता खुरपणी आणि कोळपणीची पारंपरिक पद्धत हळूहळू संपुष्टात येत आहे. त्याऐवजी झटपट काम करणाऱ्या रसायनांची फवारणी केली जाते. ही रसायने संबंधित पिकाव्यतिरिक्त इतर सर्व वनस्पती नष्ट करतात. शेतात पीक नसताना उगवणाऱ्या नव्या तणांच्या नियंत्रणासाठी तणनाशक रसायनांचा सर्रास वापर केला जात आहे.

फवारणी करताना घ्यावयाच्या खबरदारीबाबतही पुरेशी माहिती आणि जागरूकता नसल्याचे दिसून येते. त्यामुळे नागरिकांना सुरक्षित धान्य, भाजीपाला आणि फळे उपलब्ध करून देण्यासाठी या अतिविषारी रसायनांच्या विक्रीवर बंदी घालणे आवश्यक आहे. याबाबत पुरेशी जनजागृती करण्यासाठी ठोस पावले उचलण्याची योजना आखली पाहिजे. शेतकऱ्यांना पर्यायी पद्धती आणि सुरक्षित रसायनांची माहिती व उपलब्धता सुनिश्चित केली पाहिजे.

सरकारने सेंद्रिय आणि विषमुक्त शेतीचा संकल्प केला आहे, मात्र तो फक्त संकल्पच ठरतो आहे त्याची प्रभावी अंमलबजावणी नाही. हा संकल्प मुख्य प्रवाहातील शेतीपर्यंत पोहोचवण्यासाठी अजून मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करण्याची गरज आहे. सरकारांनी नागरिकांच्या जीवनाच्या मूलभूत अधिकाराचे संरक्षण करण्याची आपली जबाबदारी ओळखून त्यासाठी आवश्यक ती पावले उचलण्यास पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा आहे.परंतु सगळेच सरकारवर सोडून चालणार नाही.समाजाची कर्तव्ये समाज विसरत चालला असल्याने तो विस्कळीत झाला असून त्याने जबाबदारी झटकून चालणार नाही.व्यक्ती हा समाजाचा घटक आहे.त्याचा मिळून समाज बनतो.पण तो जोवर जीवनाकडे सकारात्मक पद्धतीने बघत नाही तोवर व्यक्तीसह देशही सुखी होऊ शकणार नाही.जगण्यासाठी जे काही लागते ते विषमुक्त असले पाहिजे त्यासाठी सामुदायिक प्रयत्न करावे लागतील.त्यासाठी व्यापारी शेतीचे खुळ डोक्यातून काढून टाकावे लागेल.

ज्ये.पत्रकार प्रताप आसवे यांना भावपूर्ण श्रध्दांजली

धुळे, दि.३०- मुंबईतील एका खाजगी रूग्णालयात प्रताप आसवे यांचे बुधवारी सायंकाळी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७६ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे, असा परिवार आहे.

युवक क्रांती दलाच्या माध्यमातून चळवळीत सहभाग घेतला होता. मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याच्या मागणीसाठी झालेल्या आंदोलनात त्यांनी भाग घेतला होता. व त्यांनी तुरूंगवासही भोगला होता. गिरणी कामगारांमध्ये लढाऊ नेते म्हणून त्यांची ओळख होती. प्रताप आसवे यांनी चार दशकाहून अधिक काळ पत्रकारीतेत कार्यरत होते. राजकीय विषयांवर नियमितपणे लिखाण करीत असत. आसवे यांनी अभ्यासपूर्ण विश्लेषणातून पत्रकारीतेत मोलाचे योगदान दिले. त्यांच्या निधनाने पत्रकारिता क्षेत्राची मोठी हानी झाली आहे.

ज्येष्ठ पत्रकार प्रताप आसवे यांना दैनिक आपला महाराष्ट्र कार्यालय विर सावरकर मार्ग येथे यामुळे धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली. या प्रसंगी पत्रकार संघाचे पदाधिकारी, सदस्य, ज्येष्ठ पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ.तुषार निकुंभे यांना एम.एस.आर्थोपेडीक पदवी




धुळे, दि.२८- शहरातील डॉ.तुषार बळवंत निकुंभे यांनी नाशिक येथील वसंतराव मेडिकल कॉलेज येथून एम.एस.आर्थोपेडीक सर्जन ही पदवी उत्तम गुणांनी संपादन केली. डॉ.निकुंभे यांनी एम.बी.बी.एस.पदवी के.ई.एम.हॉस्पिटल मुंबई येथून पूर्ण केली.

डॉ.तुषार निकुंभे हे जे.आर. सिटी हायस्कूलचे सेवानिवृत्त उपमुख्याध्यापक बळवंत भिमराव निकुंभे व जि.प.शाळा मोघणच्या उपशिक्षिका वंदना बळवंत निकुंभे यांचा मुलगा आहे. या यशाबद्दल धु.ए.सोसायटीचे मा.अध्यक्ष रवींद्र बेलपाठक, विद्यमान अध्यक्ष युवराज करनकाळ, मानद सचिव संतोष अग्रवाल यांच्यासह डॉ. कृष्णमोहन सैंदाणे, निवृत्त प्राचार्य पंडीत भिमराव निकुंभे, भाईदास निकुंभे, डॉ.जितेंद्र निकुंभे, डॉ.सौरभ निकुंभे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक विलास हलकारे, नागरे, डॉ. प्रांजल पाटील, डॉ.हिराजी पवार, डॉ.महाले, प्रा.विनोद जैन, बी.डी. पाटील, राजेंद्र गुलाले, नंदकिशोर शेवाळे आदि मान्यवरांनी अभिनंदन केले.

धुळे, दि.३०- शहराच्या विविध प्रभागांमध्ये डासांचे प्रमाण वाढल्यामुळे हिवताप, डेंग्यु सदृश्य आजारांच्या रूग्णांमध्ये वाढ झालेली दिसून येत आहे. खाजगी तसेच शासकीय रूग्णालयांमध्ये रूग्णांची गर्दी होत आहे. मनपाने सर्वच प्रभागांमध्ये फवारणी, अबेटींग तसेच धुरळणी करावी अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे. काही प्रभागांमध्ये डेंग्यु सदृश्य आजाराची लागण नागरिकांना झालेली असल्याने मनपाने सतर्कता बाळगावी अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

प्रकाश में आज– राजनिती



नानापाटेकर अजयदेवगन करिनाकैफ
रणवीर कपूर अर्जुन रामपाल मनोज वाजपेयी

TO BOOK TICKETS SCAN THE QR
ज्योती सिनेमा 3D JYOTI DOLBY DIGITAL PLUS



ता. १७ से रोज २ खेल टा. ६,९ बजे
जेलर-2 (हिंदी)
9422789999/9823177599 Jyoticinemadhule.
bookmyshow my show my time my seat

TO BOOK TICKETS SCAN THE QR
ज्योती सिनेमा 3D JYOTI DOLBY DIGITAL PLUS



ता. 23 से रोज 12, 3 बजे
दृश्यम (हिंदी)
9422789999/9823177599 Jyoticinemadhule.
bookmyshow my show my time my seat

पान १ वरुन

दुष्काळ निवारण कामात हलगर्जीपणा खपवून

परिस्थितीत प्रशासनाने केवळ कागदोपत्री काम न करता प्रत्यक्ष क्षेत्रात उतरून नागरिकांच्या समस्या सोडवाव्यात, अशी अपेक्षा आमदार नाईक यांनी व्यक्त केली. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कामचुकारपणा न करता आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी. कामात हलगर्जीपणा करणाऱ्यांनी अन्यथा आपली बदली करून घ्यावी, अशा कडक शब्दांत त्यांनी अधिकाऱ्यांना सुनावले.

शेतकरी कर्जमाफी व दुष्काळी मदतीबाबत चर्चा

आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शेतकरी कर्जमाफीच्या अनुषंगानेही बैठकीत चर्चा झाली. पात्र शेतकऱ्यांची माहिती संकलित करणे, शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे आणि दुष्काळी मदतीसाठी आवश्यक प्रस्ताव व कागदपत्रे अद्ययावत ठेवण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.यावेळी सरपंच व स्थानिक पदाधिकाऱ्यांनी आपल्या गावातील पाणीटंचाई, चारा उपलब्धता आणि शेतकऱ्यांच्या अडचणी प्रशासनाच्या निदर्शनास आणून द्याव्यात, असे आवाहन करण्यात आले.

जनतेच्या प्रश्नांबाबत संवेदनशील राहावे

दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी सर्व शासकीय विभागांनी परस्पर समन्वय राखून जबाबदारीने काम करणे आवश्यक आहे. नागरिक, शेतकरी आणि पशुपालकांच्या समस्या प्राधान्याने सोडवून शासनाच्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवावा. यासाठी प्रशासनाने तत्परतेने कार्यवाही करावी, असे निर्देश आमदार शिरीषकुमार नाईक यांनी दिले. बैठकीत दुष्काळ निवारणासाठी प्रशासनाची जबाबदारी आणि लोकप्रतिनिधींच्या समन्वयातून प्रभावी उपाययोजना राबविण्याची गरज अधोरेखित करण्यात आली.

चांदे गावांत घरफोडी हजारोंचा ऐवज लंपास

५०० रुपयांचा ऐवज लंपास केला. सोन्याचे दागिन्यांची आजच्या बाजारभावाची किंमत लक्षात घेता ती तीन लाखांपेक्षा जास्त आहे.याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात घरपोडीचा गुन्हा दाखल झाला. हवालदार सोनवणे तपास करीत आहेत.

धुळे जिल्हा वडार समाजाची मागणी

९३२३/१९९२ च्या दस्तान्वय सरदार इंडस्ट्रीज तर्फे वालीबेन प्रकाशचंद मंडोरे यांना प्लॉट नंबर १७४ दिला होता.

प्रस्तुत मिळकतीबाबत धुळे नगरपालिकेने प्लॉट नंबर १७४ यास १८ एप्रिल १९७७ नुसार बांधकाम परवानगी प्रदान केली. तसेच प्लॉट नंबर १७५ अ यास २४ सप्टेंबर १९९६ रोजी बांधकाम परवानगी दिली. मात्र १७५ ब हा प्लॉट अस्तित्वात नसताना प्रस्तुत प्लॉट दाखवून त्यास कोणती कायदेशीर परवानगी नसताना सरदार इंडस्ट्रीच्या तर्फे सदरच्या मिळकतीमध्ये पूर्व पश्चिम असलेल्या वापर रस्त्याला भिंत बांधून कुंपण टाकण्यात आले व ताबा बसवला. या ठिकाणी १७५ ब हा प्लॉट असल्याचे दाबून दाखवून परवानगी नसताना बंगला उभा करण्यात आला.यामुळे या मिळकतीच्या मागे असणाऱ्या सर्वच प्लॉट धारकांना जुन्या मुंबई आग्रा रोडवर येण्याचा मार्ग बंद झाला. या संदर्भात वेगवेगळ्या न पिठाशना समोर अपील दाखल करण्यात आले यानंतर प्रस्तुत अपील संचालक भूमी अभिलेखा पुणे इथपर्यंत नेण्यात आले प्रस्तुत सगळे अपील पिठासनांनी नामंजूर केले प्रस्तुत मिळकतीचे बांधकाम वापर रस्त्यावर करण्यात आले असे धुळे जिल्हा वडार समाजाच्या वतीने निवेदनात नमूद केले आहे. मंडोरे कुटुंबांचा नगरपालिकेत दबदबा असल्याने त्यांचे विरुद्ध कारवाई केली जात नाही असे वडार समाजाचे म्हणणे आहे.

महापालिकेने ३ जानेवारी २००६ ला नोटीस देऊ मंडोरे यांनी पूर्वेकडून पश्चिमेकडे जाणाऱ्या रस्त्यावर तीस फुटाचे अतिक्रमण केले आहे. ते काढून घ्यावे व नागरिकांसाठी रस्ता खुला करून द्यावा असे मुद्दे नोटीसित नमूद केले होते. मात्र त्याबाबत आजपर्यंत कोणतीही कारवाई झालेली नाही या रस्त्यावर असणारे अतिक्रमण त्वरित काढावे ही कारवाई पंधरा दिवसाच्या आत न झाल्यास आम्ही आंदोलन करू असा इशारा दीपक किशन वेताळ राहुल जगन्नाथ वेताळ अंबादास अशोक लष्कर अशोक मुकुंदा कुसळकर आणि शिवराम कुसळकर आदींनी दिला आहे.

निवेदनातील माहिती खोटी- चेतन मंडोरे

महापालिका आयुक्तांना वडार समाज संघातर्फे देण्यात आलेल्या निवेदनातील माहिती खोटी व चुकीची असल्याचे चेतन मंडळी यांचे म्हणणे आहे.१९६१ सली प्लॉट खरेदी केला होता त्यावेळी टाऊन प्लॅनिंग विभाग नव्हता. त्यामुळे रस्त्याचा प्रश्न नाही. १५७ नंबरचा भूखंड जो निवेदनात दिला तो माझा नाही.प्लॉट नंबर १७५ अ व १७५ ब हे माझे खाजगी प्लॉट आहेत.आज मला महापालिकेचे एक पत्र मिळाले आहे.त्याची उत्तर मी देणार आहे. २००६ साली मला नगरपालिकेकडून नोटीस देण्यात आली होती. त्यानंतर मी सेशन कोर्टात गेलो व माझी बाजू मांडली. निकाल माझ्या बाजूने लागला असून या निकालाला आज पर्यंत कुठेही चॅलेंज केले नसल्याचे,चेतन मंडोरे यांनी सांगितले.

पान १ वरुन

देशात अराजकता माजविणाऱ्या विघातक ताकदींना

आंदोलने करून अराजकता माजविण्याच्या उद्देशाने काँग्रेससह विरोधी परकीय शक्तींच्या निषेधार्थ आज येथील आमदार अनुपभैया अग्रवाल यांचे जनसंपर्क कार्यालय ते जमनालाल बजाज रोडपर्यंत भारतीय जनता पक्षातर्फे लोकतंत्र बचाओ- अराजकता हटाओ पदयात्रा काढण्यात आली. तिच्या समारोप्रसंगी भाषण करताना पालकमंत्री रावल बोलत होते.

यावेळी माजी केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे, शहराचे आमदार अनुपभैया अग्रवाल, धुळे ग्रामीणचे आमदार राम भदाणे, महापौर मायादेवी परदेशी, उपमहापौर ज्योत्स्का पाटील, भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष बापू खलणे, नंदुरबार जिल्हाध्यक्ष निलेश माळी, माजी जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी, भाजपच्या महिला आघाडीच्या धुळे जिल्हाध्यक्षा धरती देवरे, महापालिकेच्या स्थायी समितीच्या सभापती लताबाई पोतदार, महिला व बालकल्याण सभापती उज्ज्वला ठाकरे, माजी महापौर चंद्रकांत सोनार, जयश्री अहिरराव, बाळासाहेब भदाणे, भाऊसाहेब देसले, किशोर सिंगवी, शशी मोगलाईकर, पवन जाजू, सुनील कपिल, पृथ्वीराज पाटील, अजय अग्रवाल, आकाश परदेशी यांच्यासह भाजपचे धुळे शहर, ग्रामीणचे विविध आघाड्यांचे पदाधिकारी, नगरसेवक, कार्यकर्ते पदयात्रेत सहभागी झाले होते. पालकमंत्री रावल म्हणाले, की निवडणूक आयोगाकडून भारतात आतापर्यंत वेळा विशेष मतदार सखोल पुनरीक्षण मोहीम राबविण्यात आली. यात सर्वाधिक वेळा काँग्रेस सत्तेत असताना ही मोहीम झाली. आम्ही कधी या मोहिमेचा बाऊ केला नाही. निवडणूक आयोग ही स्वायत्त संविधानिक संस्था असून, तिने घेतलेल्या निर्णयांशी सरकारचा कुठलाही संबंध नसतो. त्याच अनुषंगाने आताही एसआयआर मोहीम सुरू आहे. मात्र, देशभरातील विविध निवडणुकांमध्ये सातत्यपूर्ण अपयश पचनी पडत नसल्याने काँग्रेससह विरोधकांकडून केंद्र सरकार, निवडणूक आयोगासह आता सर्वोच्च न्यायालयासारख्या संविधानिक संस्थांना कमकुवत करण्यासाठी विदेशातील देशविघातक ताकदींच्या जोरावर भारतात विविध आंदोलनांच्या माध्यमातून अराजकता माजविण्याचा प्रयतक सुरू आहे. एसआयआरला विरोध करून देशभरात शिरलेल्या बेकायदेशीर घुसखोरांना वाचविण्याचा प्रयत्न होत आहे.

लोकशाही कमकुवत करण्याचा प्रयत्न हाणून पाडू

देशातील जनतेचा कामातून विश्वास जिंकण्याऐवजी विरोधक निवडणुकीतील पराभवाचे खापर संविधानिक संस्थांवर फोडत लोकशाही कमकुवत करत आहेत. देशातील जनता हे सर्व पाहत असून, ती कधीच विरोधकांचे मनसुबे यशस्वी होऊ देणार आहे. कारण राष्ट्र प्रथम हे देशातील जनता जाणून आहे. या अराजकतेच्या राजकारणाचा, देशविघातक शक्तींचा प्रयतक हाणून पाडण्यासाठी सर्व देशवासीयांनी विरोधकांचे सर्व मनसुबे उधळून लावण्यासाठी एकजुटीने लढा देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहनही पालकमंत्री रावल यांनी केले.

अटक करण्यासाठी आलेल्या पोलिस

उसे दवाखाना लेके चलो असे सांगून पोलिसांची दिशाभूल केली, आणि गर्दीचा फायदा घेत आरोपी जब्बार शाह याला पळून जाण्यास मदत केली. याप्रकरणी आझादनगर पोलीस ठाण्याचे हवालदार गौतम राजेंद्र सपकाळे यांनी फिर्याद दिली. त्यानुसार जब्बार गुलाब शाह फकीर, तमन्ना गुलाब शाह, मेहराज बानो शाह, हलीमाबी गुलाब शाह, नजमाबी इस्माईल शाह, परवीनबी रफीक शाह, आदील गुलाब शाह, जाकीर गुलाब शाह, इकबाल गुलाब शाह, अमन रफीक शाह, मुझम्मील रफीक शाह, फकीरा शाह, रमजान रफीक याच्या मामाचा मुलगा (सर्व रा. वडजाई रोड, धुळे) यांच्याविरुद्ध आझादनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे, आझाद नगर पोलीस ठाण्याचे निरीक्षक विनोद पाटील, मोहाडी पोलीस ठाण्याच्या निरीक्षक शिल्पा पाटील, शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक अर्चना पाटील, पोलीस उपनिरीक्षक समाधान सुरवाडे यांनी घटना स्थळाची पाहणी केली.

टायटल व्हेरिफिकेशनसाठी जाहीर नोटीस

तमाम जनतेस सर्व हितसंबंधितांना तसेच सर्व वित्तीय संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीचे मालक श्री. दिलीप काशिनाथ माळी रा. मु. पो. अजंग ता. जि. धुळे यांचेशी आमचे अशिल अल्ट्रा गॅस ॲण्ड एनर्जी मुंबई यांनी खालील नमूद मिळकत २१ वर्षाच्या मुदतीसाठी भाडे तत्वावर घेण्याचे ठरविले असून लवकरच उभयपक्ष रजिस्टर भाडे करारनामा नोंदवणार आहेत.

तरी सदर मिळकतीत कोणाचेही कोणतेही प्रकारचे मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध, गहाण, बोजा, टाच, जप्ती, भाडेपट्टा, ताबा हक्क, वहीवाट हक्क, सौदे करार, वारस हक्क, मृत्यूपत्र, अन्वये अधिकारी हक्क वै. असल्यास किंवा संबंधीत व्यवहारास कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास व विरोध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत त्याबद्दल स्वत:च्या हक्काच्या प्रमाणीत झेरॉक्स आम्हाला खालील पत्त्यावर लेखी कळवावे. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

मिळकतीचे वर्णन : मौजे अजंग ता. जि. धुळे येथील गट नं. २६५/३ चे क्षेत्र १ हे. ७७ आर. पोट खराब ० हे. ४२.६६ आर एकूण क्षेत्र २ हे. १९.६६ आर त्यासी चतु:सिमा पुढील प्रमाणे.

पुर्वेस :गट नं. २६३, २६४, २६८ पश्चिमेस : गट नं. २६५/२

दक्षिणेस : गट नं. २६६ उत्तरेस : राष्ट्रीय महामार्ग


सदर जाहीर नोटीस आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. १९/१०/२०२६

ॲड.राहुलकुमार एस. मैंद मो. ९४२२२५९०७५

ऑफिस : ४.हिरे भवन, जिल्हा न्यायालय समोर, स्टेशनरोड, धुळे

शब्दकोडे क्रमांक.२४८२



आडवे शब्द : १.हिंदीत-निसर्ग ५.बर्फाचा डोंगर ८.ओलसर ९.ठेकेदार ११.वनस्पती तुपाचा एक प्रकार १३.दाणेदार सांजा १५.अस्वल १६.सुंदर १७.त्वरेने १९.गुपित २१.शाहरूख खान,सनी देओल,जुही चावला यांचा एक सिनेमा २३.संघर्ष २४.रोकड २६.मासा,एक रास २७.एक मुस्लिम सण २८.ताविज ३०.जबरी चोरी ३२.दम ,अरूण नलावडे यांचा एक सिनेमा ३३.किंवा,परंतु ३५.स्वर ३६.हिंदीत-जीव ३८.लालसर रंगाची माती जी रांगोळी काढण्यापूर्वी सारवली जाते ३९.बर्फाळ प्रदेशातील एक केसाळ प्राणी ४१.लत ४३.पंजाबी हॉटेल ४४.नौका ४५.भौगोलिक स्थिती दर्शवणारा आराखडा ४७.उणीव ४९.वारा ५०.नायिका ५१.एक प्रकारचे विदेशी मदय ५२.जम ५४.सर्व ५७.जोम ५८.यमाचे घर ५९.एक प्रकारचा गुजराती नाच **उभे शब्द :** १.जमिन खणण्याचे एक हत्यार २.धाप ३.भात शिजताना होणारा आवाज ४.गोविंदा,करिष्मा कपूर यांचा एक सिनेमा ५.बर्फ ६.दंगा ७.गोटया खेळताना पाडलेला लहान खळगा १०.विजया दशमी १२.खेळातील एक भाग १४.उपयोग १७.हिंदीत-अभ्यास १८.गंजा २०.अमिताभ बच्चन,नीतू सिंग यांचा एक सिनेमा २२.श्रीमंत २३.भारतीय गायन सम्राज्ञी २५.सालीतील वाटाणे २९.बारा वर्षाचा काळ ३१.मावशीच्या नात्यातला ३२.कुत्रा ३४.सौदी अरेबियातील चलन ३६.स्वाद ३७.हाड नसलेला कोंबडीच्या वा बकऱ्याच्या मांसाचा तुकडा जो निखाऱ्यावर भाजून खातात ४०.मुसलमानांचे स्मशान ४२.रामाने चौदा वर्षे भोगला ४४.फळाच्या आतील मगज ४६.रूबाबदार,शाहीद कपूरआणि आलिया भट यांचा एक सुमार सिनेमा ४८.युदध ५६.पुरूष ५५.नंतर ५६.इंग्रजीत-तु

शब्दकोडे क्रमांक.२४८१ चे उत्तर

बा	ल	वा	डी	■	घा	त	क	■	हो	का	र
ल	■	ह	म	ला	व	र	■	श्या	म	■	ह
क	फ	न	■	ल	■	स	ला	म	■	हा	स्य
पा	ळी	■	प्र	सा	र	■	व	ल	य	■	म
ल	■	दा	ता	■	त	र	णी	■	स	व	य
क	प	■	प	त	■	ज	■	कु	■	क्त	■
■	प	रा	ग	■	बा	ई	ल	वे	डा	■	पा
रा	ई	■	ड	म	रू	■	वा	त	■	रा	डा
य	■	व्वा	■	ख	द	ख	द	■	न	■	व
ता	प	■	घा	म	■	ग	■	न	ख	रा	■
■	ढा	का	■	ली	ला	■	न	व	■	जा	च
सा	ई	ना	थ	■	भ	र	भ	रा	ट	■	व




धुळ्यात डेंग्युच्या सदृश्य रूग्णसंखेत वाढ

धुळे, दि. ३०- शहराच्या विविध प्रभागांमध्ये डेग्यु सदृश्य रूग्णांच्या संख्येत वाढ झाली असल्याने खाजगी तसेच शासकीय दवाखान्यांमध्ये उपचारासाठी गर्दी होवू लागली आहे. डासांवर नियंत्रणासाठी फवारणी, फॉगींग, अबेटींग करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

जवाहर मेडी.दंत महा.त विद्यार्थ्यांचा स्वागत सोहळा विद्यार्थ्यांनी उत्तम डॉक्टर व्हावे-डॉ. अरूण दोडामणी

धुळे, दि.३०- चला एक जबाबदार डॉक्टर बनूया, आणि निरोगी समाज घडवूया! रुग्णसेवेची भावना उराशी बाळगून जवाहर मेडीकल फाउंडेशनच्या दंत महाविद्यालयात प्रथम वर्षात नव्याने प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचा व्हाईट कोट सेरेमनी व स्वागत समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अरुण दोडामणी यांनी आदर्श व उत्तम डॉक्टर बनण्याचे आवाहन केले.



जवाहर मेडीकल फाउंडेशनचे आण्णासाहेब चुडामण पाटील दंत महाविद्यालय मोराणे प्र.ल.धुळेच्या प्रथम वर्षात(२०२६-२७) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक वर्षाला प्रारंभ झाला.त्याअनुषंगाने सोमवार दि.२६ ऑक्टोबर २०२६ रोजी महाविद्यालयात व्हाईट कोट सेरेमनी व स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. जवाहर मेडीकल फाउंडेशनचे चेअरमन मा.आ.कुणाल बाबा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जवाहर मेडीकल फाउंडेशनच्या माध्यमातून रुग्णसेवेचे काम अविरतपणे सुरु आहे. त्यासोबतच विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाची सोय व्हावी म्हणून अद्ययावत शिक्षण येथे दिले जाते. व्हाईट कोट सेरेमनी व स्वागत समारंभाचे कार्यक्रमाचे उद्घाटन अधिष्ठाता डॉ.अरुण दोडामणी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ. अरुण दोडमणी यांनी सांगितले कि, जवाहर मेडीलकल फाउंडेशनचे महाविद्यालय हे रॅगिंगमुक्त असून विद्यार्थ्यी महाविद्यालयाचे नियम शिस्त पाळत असतात.त्यामुळेच येथे शिक्षण घेणारा विद्यार्थी निष्णात व तज्ञ डॉक्टर घडत असतो,म्हणून दंत शास्त्राचे वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी रुग्णांप्रती जिव्हाळा आणि सहानुभूती ठेवत एक आदर्श व उत्तम डॉक्टर म्हणून काम करावे. वैद्यकीय सेवा करीत असतांना रुग्णांचा विश्वास जिंकत रुग्णसेवा करण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमात डॉ.प्रज्ञा रेलन यांनी विद्यार्थ्यांना माहिती देतांना सांगितले कि, दंत महाविद्यालयाने उत्तम कामगिरी आणि गुणवत्तेच्या आधारावर राष्ट्रीय पातळीवरचे प्रतिष्ठित पुरस्कार पटकविले आहेत. विद्यार्थी व पालकांना विविध विभाग,शैक्षणिक उपक्रमांची माहितीही दिली.याप्रसंगी विद्यार्थ्यांना व्हाईट कोट मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. डॉ.मनिष शर्मा यांनी विद्यार्थ्यांना वैद्यकीय व्यवसायाची निष्ठा व कर्तव्याची शपथ दिली. नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांचे कौतुक करीत सचिव डॉ.ममता पाटील,सहसचिव संगिता पाटील,अधिष्ठाता डॉ. नितीन कुलकर्णी यांनी स्वागत केले व शुभेच्छाही दिल्या. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ.प्रियदर्शनी यांनी केले.

पाणी जपून वापरा जनतेला आवाहन

शहादा,दि.२९(प्रतिनिधी)- एल-निनो आणि दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याची उपलब्धता अबाधित ठेवण्यासाठी तसेच जनावरांसाठी आवश्यक पाण्याची व्यवस्था करण्याच्या दृष्टीने नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन तापी पाटबंधारे विकास महामंडळाच्या शहादा येथील पाटबंधारे पाटशाखा प्रकाशा कार्यालयाने केले आहे. याबाबत तालुक्यातील सारंगखेडा, टेंभे बु., कोठली त.सा., बामखेडा त.सा., कळंबू, देऊर आदी ग्रामपंचायतींना पत्र पाठवून जनजागृती करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस बँक पतपेढी, पतसंस्था, वित्तिय संस्था, सावकार तसेच सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,तु.जि.धुळे पां.तु.ता.धुळे पैकी मौजे सौंदाणे येथील **ग.नं.२९१ चे ला.ला.क्षेत्र ०४ हे ७९ आर पो.ख. ०० हे ९५ आर एकुण क्षेत्र ०५ हे ७४ आर आकार ०५रु. २५ पैसे ची शेतजमीन,** यासी चतुर्सिमा गाव नकाशा प्रमाणे -पर्वु स-गट नं.२९०,गट नं.२९२,गट नं.२९९,गट नं.३००,पशिचमेस-अन्वर नाला,दक्षिणेस-गट नं.२८३,उत्तरेस-गट नं.३०१,येणे प्रमाणे वर्णनाचा आतील शेतजमीन १) **श्री.राजेंद्र नागो वाघ,२) श्री.कैलास नागो वाघ,३)शेवंताबाई नागो वाघ** सर्व रा.मु.पो. वडजाई ता.जि. धुळे यांच्या मालकीचे व ताबेउपभोगातील असुन त्यांनी वरील नमुद शेत मिळकत ही सौदापावती फकुद्दीन अहमद लोहार यांना करून दिलेली आहे. सदर वरील प्रमाणे मिळकत ही सौदापावतीच्या अधिकाराने फकुद्दीन अहमद लोहार यांनी आमचे अशिलांशी कायम खरेदीने विकत देण्याचा सौदा केलेला असुन बयाणा सुध्दा स्विकारलेला आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करणार आहेत.

तरी तमाम लोकांना,सर्व बँक,पतपेढी,पतसंस्था,वित्तिय संस्था,सावकार यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,सदर शेतजमीनीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क व व्यवहारा बाबत हरकत असल्यास,शेतजमीनीवर कोणाचाही बोजा,खावटी हक्क,इतर ह हक्क,हिस्सा,टांच,गहाण,जप्ती,वहिवाटी हक्क किंवा सदर शेतजमीनी संबधी कोणत्याही प्रकाराच्या न्यायालयात दावा न्याय प्रविष्ट किंवा प्रलंबित असल्यास तसेच कोणाचाही लाभात बक्षिसपत्र,सौदापावती,विक्री पावती,खरेदीखत करून दिलेले असल्यास,असे कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदोपत्री पुरावासह प्रत्यक्ष कळवावी.टपाल,व वर्तमान पत्रात परस्पर हरकत मान्य होणार नाही.

मुदतीत हरकती अगर तक्रारी न आल्यास सदर शेतजमीन निर्वेध व निर्बोज समजुन आमचे अशिल सदरहु शेतजमीनी चे खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदर नोटीस ही आमच्या आशिलांच्या सुचनेवरून आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.
दिनांक:-३०/१०/२०२६,स्थळ:-धुळे

ॲड.अनिल सुरेश अग्रवाल
ग.नं.४,भांडी बाजार,कांती कॉम्पलेक्स शेजारी,धुळे,७७०९७७२७५७,७५८८८८४१०७

जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, खाजगी सावकार व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे पक्षकार शकील इस्माईल शेख, रा. १०० फुटी रोड, सरदार हॉल समोर, इब्राहीम मस्जिद जवळ, धुळे यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन सदरची जाहीर नोटीस प्रसिद्धीस देण्यात येते की,

आमचे पक्षकार यांनी मुखतार अहमद अब्दुल हमीद (मुखहार अहमद अबुस हमीद) यांच्यासोबत **धुळे महानगरपालिका हद्दीतील मौजे जामचा मळा येथील सर्व्हे नं. ४३६/१व२+३ पैकी प्लॉट नं. ३० एकूण क्षेत्र १८० चौ. मी. त्यास नगरभूमापन मिळकत धुळे विस्तारीत क्र. १८१७० क्षेत्र १८० चौ. मी.** ही मिळकत मुखतार अहमद अब्दुल हमीद (मुखहार अहमद अबुस हमीद) रा. गफुर नगर, वडजाईरोड, धुळे (पूर्वीचा पत्ता) तर कबीरगंज, वडजाईरोड, धुळे (आताचा पत्ता) यांच्याशी वरील नमूद मिळकतीपैकी दक्षिण भागाचे क्षेत्र ६० चौ. मी. बखळ जागा मिळकत त्याची चतु:सिमा खालील प्रमाणे

यासी	मापे	चतु:सिमा
पुर्वेस :	३.३ मिटर	रस्ता १२ मीटर
पश्चिमेस:	३.३ मीटर	ओपन स्पेस
दक्षिणेस :	१८ मीटर	प्लॉट नं. २९
उत्तरेस :	१८ मीटर	याच प्लॉटचा उर्वरीत भाग

सदरची मिळकत ही मुखतार अहमद अब्दुल हमीद (मुखहार अहमद अबुस हमीद) यांच्या ताब्यातील व मालकी हक्काची असल्याबाबत त्यांनी आमचे पक्षकारास सांगितले असून, सदरील मिळकती बाबत आमचे पक्षकार यांनी त्यांच्याशी कायमस्वरुपी खरेदीचा तोंडी सौदा ०२ साक्षीदारांसमक्ष केलेला असून त्यासाठी त्यांनी आमचे पक्षकाराकडून बयाणाची रक्कम सुद्धा स्विकारलेली आहे. सदरील मिळकत मुखतार अहमद अब्दुल हमीद (मुखहार अहमद अबुस हमीद) यांनी शमसोद्दीन शेख मोईयोद्दीन नेरकर (खाटीक) रा. देवपूर धुळे यांच्याकडून दस्त क्र. ३८५ दि. ०९/०२/१९९६ रोजी खरेदी केलेली आहे. तसेच ७/१२ उतारा फेरफार क्र. २६७३४ प्रमाणे मुखतार अहमद अब्दुल हमीद तर **२४/०९/१९९७ च्या चौकशी नोंदवही नगर भूमापनात मिळकत पत्रीकेवर नजरचुकीने मुखहार अहमद अबुस हमीद अशी नोंद झालेली आहे. व दोन्ही व्यक्ती** मुखतार अहमद अब्दुल हमीद व मुखहार अहमद अबुस हमीद हे एकच आहे. याची संपूर्ण कल्पना त्यांनी आमचे पक्षकारास दिलेली आहे.

सदर मिळकत बाबत कोणाची काही हक्क, हितसंबंध, तारण, गहाणखत, सौदा पावती, बोजा, मुखत्यारपत्र, बक्षिसपत्र, तसेच इतर काही हक्क, हितसंबंध अगर तक्रार असल्यास मुळ कागदपत्रा सोबत आपली लेखी हरकत ७ (सात) दिवसाच्या आत आमच्या खालील पत्यावर लेखी व मुळ कागदपत्रांसह हरकत नोंदवावी. नियोजित कालवधीमध्ये कोणाचीही कोणत्याही स्वरुपाची हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्बोज व निर्वे ध आहे असे गृहीत धरुन आमचे पक्षकार हे वर उल्लेख मिळकतीचा खरेदीचा विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. तसेच सदर हरकत आमच्या पक्षकारावर व प्रस्तुत मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची गांभीर्याने नोंद घ्यावी. तसेच परस्पर वर्तमानपत्रात हरकत घेतल्यास ती देखील आमच्या पक्षकारावर व सदर मिळकतीवर बंधनकारक असणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती व हस्तऐवजावरुन त्यांचे तर्फे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे. ठिकाण : दि. ३०/१०/२०२६

ॲड. आबीद एस. पिंजारी मो. ७५०७२४३९७२
कार्यालय : अबुबकर मस्जिद जवळ, मिल्लत नगर, चाळीसगांव रोड, धुळे

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे धुळे, ता. जि. धुळे येथिल सर्व्हे नं. ३१७/१ पैकी प्लॉट नं. १२ चे एकुण क्षेत्र १८० चौ.मी. यांस सि.स.नं. १०६४९ चे क्षेत्र १८० चौ.मी., सत्ता प्रकार क यापैकी उत्तरेकडील भागाचे क्षेत्र ९० चौ.मी. यांसी चतु:सिमा पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : स. नं. ३३२, दक्षिणेस : याच प्लॉट नं. १२ पैकी उर्वरित भाग, उत्तरेस : प्लॉट नं. ११. येणे प्रमाणे बांधीव घर मिळकत १) **श्री. किशोर सुधाकर भावे** २) **सौ. जयश्री विनोद लंकड,** दोघे रा. धुळे यांचे मालकीची असुन त्यानी नमुद मिळकत कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिल **श्री. नितिन शंकर लोहार,** रा. १५, रामचंद्र नगर, पारोळा रोड, मार्केट यार्ड, धुळे याच्यांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार, पावती, अन्नवस्त्र, बक्षिसपत्र, कब्जापावती, रक्कम देणे / घेणे इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मूळ दस्त जमा / तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. तोंडी किंवा परस्पर वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे, असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही,

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेर्फत प्रसिध्द दिली असे.

धुळे. दि.३०/१०/२०२६

ॲड.विजय म.मोरे
नोटरी- भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे
मो.नं.९८२२८५२६५०

जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात,येते की, मिळकतीचे वर्णन- **मौजे गोंदूर, ता.जि. धुळे येथील सर्व्हे नं.६५/३ यामधील प्लॉट नं.५ चे एकुण क्षेत्र २१०.०० चौ.मी.,** या बखळ प्लॉटच्या चतु:सिमा मंजुर लेआउट प्रमाणे

येणेप्रमाणे वरील वर्णनातील बखळ प्लॉट श्री प्रवीण शामराव धोरण, रा. दिपक नगर, बुलढाणा रोड, मलकापूर जि. बुलढाणा यांच्या मालकीचे व कब्जे उपभोगातील असुन यांचेकडुन आमचे अशिल यांनी कायम स्वरूपी विकत घेण्याचा सौदा केलेला असून सदर सौद्यापोटी आमचे अशिलांनी बयाणापोटी रक्कम देखील दिलेली आहे. तरी सदर बखळ प्लॉट संदर्भात कोणाचेही कुठल्याही प्रकारचे संबंध, हक्क, गहाण, तारण, करार, टाच, बक्षिस, दावा, अर्जफाटे, हितसंबंध, तक्रार अथवा हरकत असेल तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर लेखी व कागदोपत्री पुरावा दाखवून प्रत्यक्ष भेटून शहानिशा करून खात्री करून द्यावी. अन्यथा उक्त मुदतीत कोणाचीही हरकत, तक्रार न आल्यास सदर बखळ प्लॉट निर्बोज, निर्वे ध समजुन सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल. त्यानंतर आलेल्या हरकतीचा अथवा तक्रारीचा विचार केला जाणार नाही. तसेच मोबाईलद्वारे, पोस्टाद्वारे तसेच परस्पर वर्तमान पत्रात घेण्यात येणाऱ्या हरकती ते आमच्या अशिलांवर व सदर बखळ प्लॉट वर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. सदरची जाहिर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती, अधिकार व सांगण्यावरून त्यांचेतर्फे आमचेमाफे प्रसिद्धीस दिली असे.

धुळे.दिनांक :-३०/१०/२०२६

ॲड.अमित अशोक वाघ
नोटरी (भारत सरकार)२२,"श्रीराम वाटीका" मधुबन कॉलनी,वाडीभाकर रोड,देवपुर,धुळे.९८२३१३६००७

NAME CHANGE

MY OLD NAME WAS
KHATIK TAWFEEKA BANO A.RASHID
MY NEW NAME IS
KHATIK TAWFEEKA BANO RASHID
ADD- GARIB NAWAZ NAGAR DATAR CHAKKI KE PICHE, DHULE-424001.

CHANGE OF NAME

MY OLD NAME WAS
PATHAN NABEEL KHAN AARIF KHAN
MY NEW NAME IS
NABEEL KHAN AARIF KHAN
ADD- LANE NO.6 LADIEZ TOILET NALA KINARE DEOPUR, DHULE MAHA 424002.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे धुळे, ता. जि. धुळे येथिल गट नं. २५ पैकी प्लॉट नं. ११ चे क्षेत्र १०१.८९ चौ. मी. यांसी चतु:सिमा पुर्वेस : गट नं. २२, पश्चिमेस : ६ मी. रस्ता, दक्षिणेस : प्लॉट नं. १२, उत्तरेस : प्लॉट नं. १०. येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत **श्री. नितिन विठठल चौधरी,** रा. सुभाष नगर, जुने धुळे, धुळे यांचे मालकीची असुन त्यांनी नमुद मिळकत कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिल १) **श्री. कुणाल अशोक माळी** २) **मिना अशोक माळी,** दोघे रा. १४, देविदास कॉलनी, जुने धुळे, धुळे याच्यांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदरहु मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, कब्जापावती, मुखत्यारपत्र, रक्कम देणे / घेणे, कोर्ट वाद, सॉल्वन्सी, आरक्षण, इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मूळ दस्त जमा / तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमान पत्रात प्रसिद्ध केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व निर्बोज आहे, असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हकरत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे. दि.३०/१०/२०२६

ॲड.विजय म.मोरे
नोटरी- भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे
मो.नं.९८२२८५२६५०

जाहीर नोटीस

तमाम लोकांना सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांन जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी येथील धुळे म.न.पा. हददीतील स.नं. १०३/२/अ/१०३/२/ब यातील प्लॉट नं.५५ चे एकुण क्षेत्र ११५० चौ.मी. बखळ प्लॉट यासी चतु:सिमा पूर्वेस प्लॉट नं.५४, पश्चिमेस - प्लॉट नं.५६, दक्षिणेस - स.नं.१०१, उत्तरेस - रोड

येणेप्रमाणे वर्णनाच्या व चतु: सिमेच्या आतील बखळ प्लॉट हा सौ. कमल साहेबराव देसाई रा.स्टेट बँकेसमोर, प्रमोदनगर, देवपूर, धुळे यांचे मालकीचे ताबे उपभोगातील आहे. सदर वरीलप्रमाणे बखळ प्लॉट हा आमचे अशिल यांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सैदा केलेला आहे व त्यापोटी बयाणा रक्कम दिलेली आहे. लवकरच आमचे अशिल हे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी तमाम लोकांना, सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीवर कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास तसेच मिळकत हक्क, हिस्सा, टांच, गहाण, बक्षिस, जप्ती, बोजा, पतपेढी जनरल मुखत्यार हक्क, मृत्युपत्र, सौदापावती, बोजा, खावटी हक्क, कोर्ट कचेरी, असे कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसाच्या आत खालील पत्यावर वैयक्तिकपणे कागदपत्रासह कळवावी. मुदतीत हरकती अगर तक्रारी न आल्यास आमचे अशील सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस आमच्या अशिलांच्या सुचनेवरून आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.दि:-३०/१०/२०२६ ठिकाण:-धुळे

ॲड.प्रमोद एम.चौधरी
११४,गोविंदा अपार्टमेंट, देवपूर,धुळे
मो. ९८६०७०६१७१

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे अशील श्री. निलेशकुमार गिरधर माळी राहणार प्लॉट नंबर ५, आयोध्या नगर, वृंदावन कॉलनी जवळ, साईश्रद्धा अपार्टमेंट समोर, देवपूर धुळे हे खालील शेड्युलमध्ये वर्णन केलेल्या बखर जागेचे (मोकळ्या भूखंडा) कायदेशीर मालक व ताबेदार आहेत.

माझ्या अशिलांनी त्यांच्या मालकीच्या सदर बखर जागेची (प्लॉटची) शासकीय मोजणी करुन हद्द निश्चित करण्यासाठी भूमी अभिलेख कार्यालय कडे रीतसर अर्ज केला आहे. त्यानुसार सदर जागेची मोजणी दिनांक ४/११/२०२६ रोजी सकाळी ९ वाजता निश्चित करण्यात आली आहे.

मोजणी करावयाच्या बखर जागेचा तपशील (शेड्युल)

- जिल्हा : धुळे, ● तालुका : धुळे, ● गाव : वलवाडी शिवार,
- सर्व्हे नंबर : १८-३/१-३/२-३/३ ● प्लॉट नं. : २७/अ
- चतुसिमा :-
  - ●पुर्वेस : प्लॉट नं. २९ व ३० ●पश्चिमेस : ९ मीटर रस्ता
  - ●दक्षिणेस : प्लॉट नं., २७ ब ●उत्तरेस : प्लॉट नंबर २८

यास्तव, सदर जागेच्या लगतच्या सर्व खातेदारांना, शेजाऱ्यांना सुचित करण्यात येते की. त्यांनी मोजणीच्या वेळी स्वत: किंवा आपल्या अधिकृत प्रतिनिधीसह ७/१२ उतारा, खरेदीखत किंवा जागेच्या मालकी हक्क्याच्या कागदपत्रांसह मोजणीच्या ठिकाणी उपस्थित राहावे. मोजणीच्या वेळी उपस्थित न राहिल्यास सदर मोजणीस किंवा हद्दीबाबत काहीही हरकत नाही असे मानून मोजणीची प्रक्रिया पूर्ण केली जाईल, याची नोंद घ्यावी. सदर जाहीर नोटीस सबंधितांच्या माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्ध करण्यास दिली असे. धुळे दि. ३०/१०/२०२६

ॲड. सी. जे. सुर्यवंशी मो. ८४५०६४१८३७
जिल्हा व सत्र न्यायालय, धुळे- ४२४००१

जा.क्र.३७४/धु.वि.बँक/स्थावर मिळकत/लिलाव/नोटीस/२०२६ दिनांक- ०५/१०/२०२६

धुळे विकास सहकारी बँक धुळे. ता.जि.धुळे
स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव नोटीस

(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ (५)(११) नुसार)

ज्याअर्थी मी के.एम.वाबळे, विक्री/वसुली अधिकारी, धुळे मला उपरोक्त कायदयातील तरतुदी नुसार प्राप्त अधिकारांचा वापर करुन जाहीर नोटीस देतो, कि, धुळे विकास सहकारी बँक लि. धुळे, ता.जि.धुळे. चे नमुद थकबाकीदार व संमतीदार सभासदांना त्यांच्याकडील सदर संस्थेच्या थकबाकी रक्कमेचा त्यावरील व्याज व खर्चाचा भरणा त्यांना वाजवी व पुरेशी संधी देऊनही संस्थेकडे भरणा केलेला नाही, त्यामुळे त्यांच्या नावासमोर दर्शवलेली जप्त स्थावर मिळकतीचा जाहीर लिलावाद्वारे विक्री करून त्यांचा कडील येणे रक्कमे पोटी वसुली करणे क्रमप्राप्त झाले आहे. (तपशील येणेप्रमाणे).

सभासदाचे नांव व संमतीदारचे नांव	स्थावर मालमत्तेचे वर्णन	चतु:सिमा
कर्जदार :- श्री. शिंदे विनायक वालचंद, होळी चौक, मोहाडी उपनगर, धुळे. ता.जि.धुळे. ४२४३११ यांचे कर्जास संमतीदार म्हणून असलेले सौ.भारती विनायक शिंदे रा.मोहाडी उपनगर धुळे, ता.जि.धुळे ४२४३११ यांची स्थावर मिळकत.	१) मौजे मोहाडी उपनगर येथील गट क्र १६४/१.महानगरपालिका हद्दीतील क्षेत्र ०० हे ३१ आर. आकार ०० रु ४० पैसे.	पूर्वेस- रेल्वे लाईन पश्चिमेस- तिखी रोड दक्षिणेस- गट न.१४४/२ उत्तरेस- रेल्वेगेट

उपरोक्त स्थावर मिळकत आहे त्याच स्थितीत जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्याचे निश्चित केलेले आहे. ज्या व्यक्तींना सदर स्थावर मिळकत जाहीर लिलावाद्वारे विकत घ्यावयाची असेल, त्यांनी जाहीर लिलाव दि.०७/११/२०२६ हजर राहावे. लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाच्या प्रसंगी वाचून दाखवण्यात येथील लिलावात भाग घेणाऱ्यास अनामत म्हणून रक्कम रुपये १०,०००/- भरणा करावा लागेल, कोणतेही कारण मीमांसा न देता लिलाव तहकुब किंवा रद्द करण्याचा हक्क राखून ठेवलेला आहे.

लिलावाचे ठिकाण :- धुळे विकास सहकारी बँक धुळे ता.जि.धुळे.

लिलाव दिनांक :- दि.०७/११/२०२६ वेळ दुपारी १२ ते ३

के.एम.वाबळे
विक्री/वसुली अधिकारी
धुळे विकास सहकारी बँक लि.धुळे

जाहीर समन्स

ॲड. हर्षल भास्करराव अहिरराव शिंदखेडा

शिंदखेडा येथील मे. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात
फौ. कि. अर्ज नं. २३५/२०२६

पाटील राज सुरेश उ.व.२३, धंदा - नोकरी
रा. भरवस ता. अमळनेर जि. जळगांव
ह.मु.२६४, श्रीनाथ-३ निलगिरी, सुरत, ता.जि सुरत .... अर्जदार
विरूध्द
ग्रामविकास अधिकारी सो ा ग्रामपंचायत
निरगुडी, ता.शिंदखेडा जि.धुळे ...जाबदेणार

ज्या अर्थी वरील अर्जदार हयाने त्याचा जन्म मौजे निरगुडी ता. शिंदखेडा जि. धुळे येथे दि. ०९/१२/२००३ रोजी घरी झालेला असुन त्यासाठी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३ध) व महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी नियम २००० चे कलम ९ (३) प्रमाणे जन्माची नोंद होवुन मिळणेसाठी अर्ज सादर केलेला आहे.

त्या अर्थी तमाम जनतेस या जाहीर संमन्स द्वारे कळविण्यात येते की, वरील अर्जाचे कामी सुनावणी तारीख २६/११/२०२६ ठेवण्यात आली आहे. तरी या न्यायालयात वरील जन्माची नोंद होणेबाबत कोणाची हरकत असल्यास इतर हितसंबध असल्यास या न्यायालयात दि.२६/११/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून आपले म्हणणे सादर करावे. वरील तारखेस व वेळी कोणाची हरकत न आल्यास निर्णय देण्यात येईल. मग नंतर काही एक तक्रार ऐकून घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहिर संमन्स नोटीस न्यायालयाचे सही शिक्क्यानिशी दिली असे.दि.२२/१०/२०२६

सही...
सहा. अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
शिंदखेडा ता. शिंदखशडा जि. धुळे

जाहीर नोटीस

शहादा येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो., यांचे कोर्टात

क्रि.कि.अर्ज नं.३३०/२०२६

भिमसिंग महादु पटले, उ.व.७६, धंदा- शेती,
रा.आंबापुर, ता.शहादा, जि.नंदुरबार. ....अर्जदार
विरूध्द
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत आंबापुर, ता.शहादा, जि.नंदुरबार. ....गैरअर्जदार

अर्ज:- मृत्यू मृत्यू नोंदणी अधिनियम २०२६ चे कलम १३ (३)(अ) अन्वये

ज्याअर्थी अर्जदाराचा भाऊ कै.रेहंज्या महादु पटले याचा मृत्यू दिनांक-१३/०७/१९९६ रोजी मौजे आंबापुर, ता.शहादा, जि.नंदुरबार येथे झाला असून त्याच्या मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू अधिकारी यांचे दप्तरी नोंद केली गेली नाही म्हणून वर नमुद दाखला अर्जदाराने जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम २०२६ चे कलम १३(३)(अ) अन्वये मृत्यू दाखला मिळणेसाठी शहादा येथील म.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील अर्जासंदर्भात कोणास काही म्हणणे अगर हरकत सादर करावयाचे असल्यास ते सादर करण्यासाठी दि.११/१२/२०२६ रोजी चौकशीच्या दिवशी किंवा --- दिवसांच्या आत सकाळी ११:०० वाजता स्वत: अगर वकिलांमार्फेत शहादा येथील म. ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट सो. वर्ग-१ सो. शहादा यांचे कोर्टात हजर राहुन लेखी म्हणणे सादर करावे.

तरी तमाम जनतेस या नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या दिवशी कोणीही व्यक्ति स्वत: अगर आपल्या वकिलांमार्फेत हजर न झाल्यास सदर अर्जाच्या बाबतीत कोणाचीही काहीएक तक्रार नाही असे गृहीत धरण्यात येवून सदर अर्जात पुढील योग्य ते हु

पान १ वरुन

भूतानमध्ये हिमनदीचे सरोवर फुटून जलप्रलय

संकोश नदीला आलेल्या पुरामुळे पश्चिम बंगालमधील अलीपूरद्वार आणि जलपाईगुडीच्या सखल भागांना तसेच आसाममधील कोकराझार आणि धुबरी जिल्ह्यांना पुराचा धोका निर्माण होऊ शकतो. पुढे ही नदी ब्रह्मपुत्रेला जाऊन मिळते.

घटना कधी आणि कुठे घडली?

एकोणतीस ऑक्टोबरच्या संध्याकाळी भूतान मधील गासा जिल्ह्यातील लाया गेओग परिसरातील शिंताफू त्शो सरोवरातून पाणी बाहेर पडू लागले. हे सरोवर वाकिला पर्वतरांगांच्या पायथ्याशी असून भूतानमधील संभाव्य धोकादायक १७ हिमनदी सरोवरांपैकी एक आहे. सरोवरातून बाहेर पडलेले पाणी मोछू नदीच्या पाणलोट क्षेत्रातून वेगाने पुढे सरकले. रात्री सुमारे सव्वाआठ वाजता पुराचे पाणी ताक्तसेमाखांग परिसरात पोहोचल्याचे वृत्त आहे. पाण्याच्या प्रचंड प्रवाहामुळे गासा त्साचू हा प्रसिद्ध गरम पाण्याचा झरा पूर्णपणे उद्ध्वस्त झाला. तसेच पुनाखा-गासा महामार्गाच्या काही भागांचे नुकसान झाल्याने वाहतूक विस्कळीत झाली.

आसाम-बंगालमध्ये प्रशासन सतर्क

भूतानमधील या घटनेनंतर भारतातील सीमावर्ती भागांमध्ये प्रशासनाने सतर्कता वाढवली आहे. संकोश नदीच्या पाणीपातळीत वाढ झाल्यास पश्चिम बंगाल आणि आसाममधील सखल भागांना फटका बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे संभाव्य पूरस्थितीचा सामना करण्यासाठी बचाव पथके सज्ज ठेवण्यात आली असून नागरिकांना प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. दरम्यान, भूतानमधील हिमनदी सरोवर फुटल्यामुळे निर्माण झालेल्या पुराचे पाणी भारतात पोहोचण्याची शक्यता लक्षात घेता पश्चिम बंगाल आणि आसाममधील प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे.

हेलिकॉप्टर कोसळले सहा जण बेपत्ता

प्रवासी बेपत्ता झाले आहेत. त्यांचा शोध घेतला जात आहे.

हेलिकॉप्टर कोसळल्याची माहिती मिळताच जिल्हा प्रशासनाने बचावकार्य सुरू केले. उत्तराखंड नागरी उड्डाण विकास प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, हेलिकॉप्टरचा संपर्क तुटल्यानंतर त्याचे लोकेशन चाई गावाच्या वर असलेल्या लष्करी छावणीजवळ आढळले. हेलिकॉप्टरमध्ये पाच प्रवासी आणि एक वैमानिक असे एकूण सहा जण होते, ते सारे बेपत्ता आहेत. या दुर्घटनेबद्दल उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी दुःख व्यक्त केले आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करत त्यांनी प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाला बचावकार्य वेगाने करण्याच्या सूचना दिल्या आहेत. गंभीर जखमींना तातडीने एअरलिफ्ट करून उच्चस्तरीय वैद्यकीय उपचारांसाठी हलवण्याचे निर्देश दिले आहेत. मुख्यमंत्री स्वतः या संपूर्ण घटनेवर लक्ष ठेवून आहेत.

खराब हवामानामुळे अपघात

उत्तराखंडमध्ये सध्या अनेक भागांत पाऊस, धुके आणि वादळी वाऱ्यांमुळे हवामान खराब आहे. भारतीय हवामान विभागाने ३० ऑक्टोबरसाठी चमोली, नैनीताल, चंपावत, पिथौरागढ आणि बागेश्वर या जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट जारी केला होता. या जिल्ह्यांमध्ये वीजांच्या कडकडाटासह पाऊस, गारपीट आणि ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याचा इशारा देण्यात आला होता. खराब हवामानामुळेच हेलिकॉप्टरचा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

नगरसेवकांनी ठेकेदारांच्या छातीवर उभे राहून कामे

आला. या वेळी धिरज कलंत्री यांनी आ. अनुप अग्रवालांनी शहरात मल्टी नॅशनल कंपन्यांना उद्योगासाठी आमंत्रित करावे ज्यामुळे रोजगाराचा प्रश्न सुटेल अशी विनंती केली. तसेच रावेर एमआयडीसीचे काम हे पक्षाचे काम नसून शहर विकासाचे काम असल्याने आ.अग्रवालांचे अभिनंदन केले पाहिजे असे सांगितले. महासभे समोर आलेल्या एकुण दहा विषयांपैकी एक विषय तहकुब ठेवण्यात आला.

विरोधी पक्ष नेता पदाचा पदभार स्विकारल्यानंतर दीपक खोपडे यांची ही पहिलीच महासभा असल्याने सभागृहाच्यावतीने सत्कार करण्यात आला. तसेच शहर विकासाच्या कामात विरोध करू नका अशा कान पिचक्या महापौर परदेशींनी दिल्या. त्यावर उत्तर देतांना विरोधी पक्ष नेता दीपक खोपडे यांनी केवळ विरोधासाठी विरोध करण्यासाठी महापालिकेत आलेलो नाही. आम्हालाही विश्वासात घ्या, योजना सांगा, माहिती देणार असाल तर विरोध का करू ? असा खुलासा यावेळी केला. देवपूरातील सर्व्हे नं.१०५/२ या जमिनीवरील आरक्षण क्र.२१ क्रीडांगण या आरक्षणाने बाधित क्षेत्र संपादन करण्याचा विषय तहकुब ठेवण्यात आला. महापालिकेतील सहा आयुक्त. उप अभियंता तसेच कार्यकारी अभियंता पदावर तात्पूरती पदोन्नतीच्या तीन विषयांवरही बराच वेळ खल झाले.

शहर मलनिस्सारण योजनेच्या कामाबाबत नगरसेवक धिरज कलंत्री यांनी महापालिकेने ठेकेदारा सोबत केलेले करार सर्व नगरसेवकांना देण्यात यावेत. अशी मागणीही केली.

नगरसेवक शाहबाज शाह यांनी भाजपा नगरसेवकांना प्रभागाच्या विकासासाठी वीस लाख निधी देण्यात आला व इतर नगरसेवकांना पंधरा लाख का ? उर्वरीत पाच लाख कशासाठी वापरणार आहात ? असा परखड सवाल उपस्थित केला. तसेच अल्पसंख्यांक विकास निधीचा समावेश का करण्यात आला नाही ? ही आक्रमकता नाही तर कळकळीची विनंती असल्याचे नमुद केले. त्यावर उत्तर देतांना महापौर परदेशींनी आयुक्तांसोबत बैठक घेवून पुढच्या महासभेत माहिती दिली जाईल असे सांगितले. तसेच दुजाभाव करत नसल्याचे सांगत यानंतर हिंदू-मुस्लीम असे शब्द वापरू नये अशी तंबीही नगरसेवक शाह यांना दिली. या विषयाला प्रशासकीय मान्यता मिळाल्याने विषय मागे घेण्यात आल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

मोहाडीत सराईत आरोपीची दहशत

करून घेतली. शासकीय कामात अडथळा निर्माण केला. पोलीस पथकाने सुरक्षितपणे धाव घेत त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडील तलवार जप्त केली. याप्रकरणी हवालदार मुकेश पवार यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार मोहाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रभाकर सोनवणे तपास करीत आहेत. उपअधीक्षक विश्वजित जाधव, स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे, मोहाडी पोलीस ठाण्याच्या निरीक्षक शिल्पा पाटील यांनी घटनास्थळाची पाहणी केली.

रवी काफू कालोसे जिल्हा दौऱ्यावर

प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस जिल्ह्यातील सर्व प्रमुख अधिकारी तसेच सफाई कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर दुपारी १.०० वाजता वृत्तपत्र व माध्यम प्रतिनिधींसोबत पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रहार टोल कामगार संघटना स्थापन

सरचिटणीसपदी नरेंद्र गवळी, सचिवपदी संजय गावडे व राजन निळे, कामगार कल्याण मंडळासाठी सलीम मन्सुरी व प्रशांत माळी, कार्याध्यक्षपदी किशोर पवार व किशन गवळी, संघटकपदी अनिल शिंदे, गिरीश चौधरी व कुंदन शिंदे, कार्यालयीन सचिवपदी प्रितेश उबाळे, खजिनदारपदी चेतन गवळी व राजेश साळुंखे, तर प्रसिद्धीप्रमुखपदी मनी चंडेल, संतोष गवळी व निखिल जगताप यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच संघटनेच्या प्रतिनिधी म्हणून रवींद्र कोकणे, निलेश वडनेरे, मंगेश पाटोळे, अनिल तावडे, साजिद शेख, सदानंद सोनवणे, मनोज महाले, विजय उदगीकर, अरुण पाटील, भरत साळुंखे, भूषण पाटील, अजय सपकाळ, इकबाल पटेल, चंद्रकांत शिंगाडे, नरेश पाटील, आरिफ शेख, अमोल चव्हाण, फारुख शेख, तुषार कासारले, सचिन शिंदे, दीपक पाटील, निलेश वाडेकर, कल्पेश भोये, अशोक गवळी, संभाजी पवार, योगेश माळी, निखिल गवळी, मनोज मुर्तडकर, आनंद पाटील, उमेश गवळी, संदीप हटकर, मधुकर इंगळे, महेश जगडे आदींची नियुक्ती करण्यात आली. सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना यावेळी नियुक्तीपत्रे देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

पान १ वरुन

पत्नीला मारहाण करण्यापासून रोखण्यासाठी

कोकीलाबाई यांना मारहाण करत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी इतरांच्या मदतीने कोकीलाबाई यांची आरोपीच्या तावडीतून सुटका करण्याचा प्रयतक केला. दरम्यान, पळून जाण्याच्या प्रयतकात असलेल्या आरोपीला मुरसिंग भिल, त्यांचा नातू गणेश, गावातील टिकाराम व इतर नागरिकांनी पकडले.

गंभीर जखमी झालेल्या कोकीलाबाई यांना नातेवाईकांनी शहादा येथील सार्थक हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. या घटनेची माहिती गावाचे सरपंच सुकलाल लक्ष्मण चिल यांनी पोलिसांना दिली. त्यानंतर शहादा पोलीस ठाण्यात आरोपी श्रीराम शेवाळे याच्याविरुद्ध भारतीय दंड विधान कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

या गुन्ह्याचा तपास शहादा पोलीस ठाण्याचे तत्कालीन प्रभारी अधिकारी एम. रमेश (आयपीएस) यांनी केला. आरोपीला अटक करून शास्त्रोक्त पद्धतीने तपास करत महत्त्वाचे पुरावे संकलित करण्यात आले. त्यानंतर मुदतीत दोषारोपपत्र शहादा येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात दाखल करण्यात आले.

या खटल्याची सुनावणी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश-१, शहादा अ. वि. गुजराथी यांच्या न्यायालयात झाली. सरकार पक्षातर्फे फिर्यादी, डॉक्टर व तपास अधिकारी यांच्या महत्त्वपूर्ण साक्षी नोंदविण्यात आल्या. सबळ पुराव्यांच्या आधारे आरोपी श्रीराम कालू ऊर्फ काल्या शेवाळे याचा गुन्हा सिद्ध झाल्याने न्यायालयाने त्याला भारतीय दंड विधान कलम ३०२ अन्वये दोषी ठरवून जन्मठेप व २० हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली.

या खटल्यात सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता ॲड. यशवंतराव बी. मोरे यांनी कामकाज पाहिले. मुख्य पैरवी अधिकारी म्हणून पोलीस उपनिरीक्षक योगिता राठोड व विनोद पाटील, तर पैरवी अंमलदार म्हणून पोलीस हेड कॉन्स्टेबल गणेश साबळे, पोलीस कॉन्स्टेबल देविदास सूर्यवंशी, पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रविण पटेल व शैलेंद्र जाधव यांनी काम पाहिले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जिल्हा पोलीस अधीक्षक अश्विनी सानप, अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी, शहादा गुलाबराव पाटील यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

भाजपा मध्यवर्ती कार्यालयात संघटनात्मक बैठक संपन्न

यांची प्रमुख उपस्थित आणि मार्गदर्शनाखाली उत्तर महाराष्ट्र विभागीय बैठकीयचे स्व. महादेव अंपळकर स्मृती भाजपा मध्यवर्ती कार्यालय येथे आयोजित करण्यात आले होते याप्रसंगी पणन व राज्यशिष्टचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, आमदार तथा प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, प्रदेश मुख्यालय कार्यालय प्रमुख रवी अनासपुरे, आमदार तथा प्रदेश चिटणीस मंगेश चव्हाण, प्रदेश चिटणीस रोहिणी नायडू, धुळे शहराचे आ.अनुप अग्रवाल आणि धुळे ग्रामीणचे आ.राम भदाणे यांची प्रमुख उपस्थिती लाभली धुळे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर जिल्हाकार्यकारणीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या शिस्तबध्द व नियोजनबध्द पध्दतीने वरील बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. उत्तर महाराष्ट्रातील विविध संघटनात्मक क्षेत्रांतील पदाधिकारी व कार्यकर्त्यांना एकाच व्यासपीठावर आणणारी ही बैठक आगामी संघटनात्मक नियोजनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरली. पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासह जनसेवेचे कार्य अधिक व्यापक आणि परिणामकारक करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

सोफा, डायनींग टेबल, सोफा- कमबेड, पलंग, दिवान, टिपाई, कपाट, ड्रेसींग टेबल, आराम चेअर, ऑफीस टेबल ऑफीस चेअर तसेच वास्तु-शास्त्रा योग्य शेवन लाकडाचे मंदिर तसेच मार्बलचे मंदिर आणि तुळशी वृंदावन..



शिवम कॉर्पोरेशन
प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे
फो. 9595397718, 9665886722

पाहिजेत
दुकानात कामासाठी मुले/मुली त्वरीत पाहिजेत
-: समक्ष भेटा :-
मुंदडा बुक स्टॉल
मुंदडा मार्केट, धुळे

पाहिजेत
धुळे एस.टी.स्टँडवरील पे अँड पार्किंगसाठी दुचाकी वाहने लावण्यासाठी ८ तास डयुटीसाठी होतकरू कर्मचारी त्वरीत पाहिजे.
आकर्षक पगार
-: संपर्क :-
9765229022

काम करुन मिळतील
मालमत्ता (घर, दुकान, जमीन) सिटी सर्वे ऑफिस उतारे, तलाठी ऑफिस उतारे, नाव लावणेबाबत व मालमत्ता विषयक सर्व कामे करुन मिळतील!
-: संपर्क :-
8888022577

दिवाळी फराळ
अनारसे, करंजी, चकली, चिरोटे, लाडू, चिवडे, शेव आणि बरंच काही उपलब्ध. नोंदणी आवश्यक आहे
मदर्स किचन
फुलवाला चौक, धुळे.
9049902201
7887750864

पाहिजेत
पेट्रोल पंप कामासाठी अनुभवी मॅनेजर लावणे आहे.
(जागा : १)
व पेट्रोल व डिझेल भरण्यासाठी माणूस लावणे आहे.
(जागा ४)
-: संपर्क :-
9823210266

पाहिजेत
१) ऑफिस बॉय : १०
२) सेल्समन : ०५
३) हेल्पर : १०
पत्ता :
अभिराम लाईटिंग ॲण्ड डेकोर
डिसान फॅक्टरी समोर, अवधान मालेगांव रोड, धुळे

फ्लॅट विकणे आहे
चंपाबाग साक्री रोड धुळे येथील पहिल्या मजल्यावरील 1 BHK Flat विकणे आहे.
-: संपर्क :-
9421534949
7498317318

पाहिजेत
होलसेल मेडिकलमध्ये कामासाठी मुले पाहिजेत
१) सेल्समन आणि कलेक्शन्स बाहेर गावी
२) दुकान काम हेल्पर अनुभव असल्यास प्राधान्य
-:संपर्क :-
8668932019

पान १ वरुन

अक्कलकुवा ता.तील विकास कामांना गती द्या

दायित्व आहे.दुष्काळ निवारणासाठी प्रभावी नियोजन करादुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक गावात पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करावी. आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा. आवश्यकतेनुसार विंधन विहिरींची कामे करावीत. जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देण्याचेही नियोजन करावे, असे निर्देश पालकमंत्री श्री. मुश्रीफ यांनी दिले.

जलसंधारण, जलपुनर्भरण आणि पाणीसाठा वाढविणाऱ्या कामांना प्राधान्य देऊन भविष्यात दुष्काळाची तीव्रता कमी करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना राबवाव्यात.दुष्काळामुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना शासन त्यांच्या पाठीशी असल्याचा विश्वास द्यावा. शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची अग्रिम मदत देण्याबाबतही कार्यवाही करावी , असे पालकमंत्र्यांनी सांगितले.शेतकऱ्यांनी कोणत्याही संकटाला घाबरून जाऊ नये. शासनाकडून त्यांना आवश्यक मदत मिळवून देण्यासाठी प्रयतक करण्यात येतील, असेही पालकमंत्री श्री. मुश्रीफ यांनी सांगितले.

बैठकीत महसूल, आरोग्य, पशुधन, कृषी, विद्युत, सार्वजनिक बांधकाम, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण), प्रधानमंत्री घरकुल योजना, ग्रामीण पाणीपुरवठा, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जल जीवन मिशन आणि हर घर जल यांसह विविध योजना व विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.संबंधित विभागांनी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, पात्र लाभार्थ्यांना वेळेत लाभ मिळवून द्यावा आणि विकासकामे निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी परस्पर समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देश पालकमंत्री श्री. मुश्रीफ यांनी यावेळी दिले.

आमदार आमच्या पाडवी यांनी घरकुल धारकांना प्रधान मंत्री सूर्य घर योजनेचा लाभ द्यावा. प्राथमिक आरोग्य केंद्रांना प्रशासकीय मंजुरी मिळावी, तसेच तालुक्यात रोजगार हमीची कामे करण्याच्या सूचना दिल्या.

युवा निबंध स्पर्धेत वैदेही चौधरी प्रथम

दुष्काळमुक्त कसे करेन? या विषयावर उत्कृष्ट निबंध सादर केला. तिच्या या कामगिरीबद्दल पॉश अँड पोक्सो संस्थेच्या संचालिका ॲड. स्नेहा सुनील आरेकर, ॲड. अनुजा पाठक, संस्कृत व मराठी भाषा तज्ज्ञ योगेश नगरदेवळेकर तसेच परीक्षकांच्या स्वाक्षरीचे प्रथम क्रमांकाचे गुणवत्ता प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. या निबंधात वैदेहीने जलसंधारणाचे महत्त्व, पाण्याचे नियोजन,पावसाच्या पाण्याचे संकलन तसेच गावाला दुष्काळमुक्त करण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांची उत्कृष्ट मांडणी केली.

वैदेहीच्या या उल्लेखनीय यशाबद्दल हस्ती ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन कैलास जैन, हस्ती चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष व उद्योगपती अशोक जैन, कार्याध्यक्ष किशोर जैन, तसेच हस्ती गुरूकुल मुख्याध्यापक सदाशिव महाजन सोबतच वैदेहीची आई धनश्री चौधरी व वडिल पंकज चौधरी आणि हस्ती गुरुकुलचे शिक्षकवृंद यांनी आनंद व्यक्त करीत तिचे कौतुक केले.

महा.चेंबरच्या गव्हर्निंग कौन्सिलवर अभयकुमार जैन यांची स्तुत्य निवड



दोंडाईचा, दि.३०- महाराष्ट्रातील व्यापार, उद्योग, कृषी उद्योग व सेवा क्षेत्राची शिखर संस्था असलेल्या महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ग्रीकल्चरच्या गव्हर्निंग कौन्सिलवर अभयकुमार जैन यांची स्वीकृत सदस्य म्हणून निवड झाली आहे. सन या कार्यकाळासाठी झालेल्या निवडीची माहिती चेंबरचे अध्यक्ष रवींद्र माणगावे यांनी उपाध्यक्ष महेद्रसेठ अग्रवाल यांच्या द्वारे दिली.

चेंबरच्या शतकमहोत्सवी कार्यकाळात अभयकुमार जैन यांना मिळालेल्या या जबाबदारीमुळे दोंडाईचा परिसरातील व्यापारी व उद्योजकांचे प्रश्न आणि विकासाच्या संधी राज्यस्तरीय व्यासपीठावर मांडण्यास बळ मिळणार आहे. चेंबरच्या कार्यात सक्रिय योगदान देण्यासाठी अध्यक्ष माणगावे यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

महाराष्ट्र चेंबर व हस्ती बँकेच्या पुढाकाराने हस्ती भवनात नुकत्याच झालेल्या व्यवसाय मार्गदर्शन कार्यक्रमाला स्थानिक व्यावसायिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. माजी अध्यक्ष संतोष मांडलेचा, उपाध्यक्ष महेंद्र कैलासशेठ अग्रवाल व सीए प्रकाश पाठक यांच्या उपस्थितीत जणांचे सदस्य नोंदणी अर्ज सुपूर्द करण्यात आले होते. त्याचप्रमाणे गाव तिथे उद्योजक चे उद्योग विचार मंच स्थापन करून शिंदखेडा-दोंडाईचा विभागात मोठया प्रमाणात काम करण्याचे आश्वसन देत आहोत.

अभयकुमार जैन यांच्या निवडीबद्दल ना. जयकुमार रावल, प्रसिद्ध उद्योगपती सरकारसाहेब रावल, हस्ती ट्रस्टचे अध्यक्ष अशोक जैन, हस्ती बैंक समिती चेयरमैन किशोर जैन, दीपक बोधवानी, सुनील पुरसवानी, प्रशांत ठोमरे, नरेंद्र बडगुजर, पंकज चोळके, सुनील चौधरी, योगेश जैन, चेतन जैन, अंकित वाघेला, मनोज छाजेड, अक्षय बोरसे, वीरेंद्र जैन, चोइथ कुकरेजा, हेमंत सोनार, गौतम माखीजा, गुलाम शेख, सूरज अग्रवाल आणि कैलास जैन यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी अभिनंदन केले.

निधन वार्ता

आशा पाटील



धुळे, दि.३०- देवपूर, नकाणे रोड शारदा नेत्रालय जवळील श्रध्दा नगरातील रहिवासी आशा मधुकर पाटील (मालोदकर) यांचे निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६५ वर्षांच्या होत्या.आज दि.३१ ऑक्टोबर रोजी सकाळी श्रद्धा नगर येथून दहा वाजता अंत्ययात्रा काढण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, नातवंडे, जावई असा परिवार आहे. निवृत्त प्रा.एम. व्ही.पाटील यांच्या त्या पत्नी व सरकारी वकील ज्ञानेश्वर मधुकर पाटील यांचे आई होत.

पान १ वरुन

अखेरच्या श्वासापर्यंत जनतेची सेवा करणार - नरेंद्र मोदी

आणि भारत बोवाइन ब्रीडिंग अँड रिसर्च सेंटरच्या उद्घाटन कार्यक्रमाला त्यांनी उपस्थिती लावली. यावेळी त्यांच्या हस्ते सुमारे १४ हजार कोटी रुपयांच्या विकासकामांचे उद्घाटन आणि पायाभरणी करण्यात आली. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी २५ ऑक्टोबरला बिहारची राजधानी पाटणा येथे माजी मुख्यमंत्री श्रीकृष्ण सिंह यांच्या १३९ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात भाषण केले होते. यावेळी एका कार्यकर्त्याने मोदी कुठेही जाणार नाहीत, असे म्हटले. त्यावर प्रतिक्रिया देताना खरगे यांनी, मोदींचा बाप देखील जाईल, असे वक्तव्य केले होते. या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली होती.

अफवा पसरवल्याचा आरोप

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांवर निशाणा साधताना काही लोकांना देश अडचणीत असताना आनंद होत असल्याची टीका केली. इराणमधील युद्धाच्या पार्श्वभूमीवर विरोधकांनी देशात खतांचा तुटवडा निर्माण होईल, शेतकऱ्यांना खते मिळणार नाहीत आणि एलपीजीचा पुरवठा खंडित होईल, अशा अफवा पसरवल्याचा आरोप मोदी यांनी केला. बदनाम करण्यासाठी विरोधकांकडून असे प्रयत्न केले जात असल्याचेही त्यांनी म्हटले.यावेळी पंतप्रधानांनी केंद्र सरकारच्या शेतकरी कल्याणविषयक योजनांचाही उल्लेख केला. जागतिक परिस्थितीमुळे खतांच्या किमती वाढल्या असल्या तरी त्याचा आर्थिक भार शेतकऱ्यांवर पडू दिला नसल्याचा दावा त्यांनी केला. पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या माध्यमातून देशातील लहान शेतकऱ्यांना आतापर्यंत ४.५ लाख कोटी रुपये देण्यात आल्याचे मोदी यांनी सांगितले. पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेच्या २४ व्या हप्त्याचे वितरण नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. या हप्त्याअंतर्गत देशातील ९.३४ कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्येकी दोन हजार रुपये जमा होणार आहेत. यासाठी केंद्र सरकारकडून एकूण १८ हजार ६९० कोटी रुपयांचा निधी वितरित केला जाणार आहे.

आंबाफाटा गावाजवळ सहाशे दहा किलो

गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२९ ऑक्टोबर रोजी आंबाफाटा गावाच्या पुढील डोंगराळ भागात वनविभागाच्या जमिनीवर अज्ञात व्यक्तींनी प्रतिबंधित गांजाच्या झाडांची लागवड केल्याची गोपनीय माहिती पोलिस निरीक्षक किशोरकुमार परदेशी यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांनी पथकासह संबंधित ठिकाणी छापा टाकला. या कारवाईत गांजाची एकूण किलो वजनाची झाडे आढळून आली. पोलिसांनी पंचनामा करून हा मुद्देमाल जप्त केला.

कारवाईदरम्यान राजपत्रित अधिकारी, शासकीय पंच, वन परिक्षेत्रीय अधिकारी, वजनकाटाधारक, छायाचित्रकार आणि फॉरेन्सिक पथकाच्या उपस्थितीत जप्तीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. जप्त केलेल्या गांजाच्या झाडांची किंमत एक कोटी ५२ लाख ५० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणी शिरपूर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४८१/२०२६ अन्वये एनडीपीएस कायद्याच्या कलम ८(क), २०(ब)(क) आणि (क) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गांजाची लागवड नेमकी कोणी केली, याचा पोलिसांकडून तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक विशाल आनंद सिंगुरी, अपर पोलिस अधीक्षक अजय देवरे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक किशोरकुमार परदेशी यांच्या नेतृत्वात करण्यात आली. सहाय्यक पोलिस निरीक्षक वर्षा पाटील यांच्यासह पोलिस अंमलदार अतुल पाटील, मनोज पाटील, अनिल सोनार, पवन ईशी, रविंद्र आखडमल, योगेश दाभाडे, गोविंद कोळी, प्रशांत पवार, मनोज दाभाडे, मनोज महाजन, सोमा ठाकरे, भटू साळुंके, विनोद आखडमल, सचिन वाघ, आरिफ तडवी, गोपाल माळी, संतोष भामरे, दादाभाई बोरसे, निलेश चौधरी, प्रशांत बाविस्कर, अनिता पवार, रविंद्र महाले, जगन्नाथ कोळी तसेच होमगार्ड मिथुन पवार यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

रवास दिवाळी निमित्त
वीर सावरकर अपार्टमेंट
फ्लॅट बुकिंग व भाड्याने देणे आहे.
1 BHK - 1000 स्के.फुट
फ्लॅट एरिया :-2 BHK - 1200 स्के.फुट,
3 BHK - 1350 स्के.फुट
बुकिंगसाठी संपर्क
मालक तात्यासाहेब रघुनाथ भगवान चौधरी
मो. 9405466937
इंजि.राजेंद्र के.खैरनार (बी.ई.सिव्हिल)
मो. 9422789513
पत्ता : वाणी मंगल कार्यालयाजवळ, भिडेबाग देवपूर, धुळे

Godrej
27 वर्षांपासून गोदरेज कंपनीचे ऐकमेव अधिकृत डिलर.



आजच खरेदी करा गोदरेजचे प्रॉडक्ट आणि मिळवा भव्य रोख सुट
BAJAJ FINSERV
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
नियम व अटी लागू*
फायनान्सला लागणारी कागदपत्रे
1) पॅनकार्ड 2) आधार कार्ड 3) बँक पासबुक व चेक
ak media- 238222
59 वर्षांपासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोनः 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०